लोकलेखा समिती

(२०१०- २०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेख्यावरील आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी

दुसरा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक १६ डिसेंबर, २०१० रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
२०१०

लोकलेखा समिती

२०१०-२०११

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेख्यावरील आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी

दुसरा अहवाल

लोकलेखा समिती
२०१०-२०११

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री.कालिदास कोळंबकर, वि.स.स.
३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
४) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.
५) श्री.अमित देशमुख, वि.स.स.
६) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर, वि.स.स.
७) श्री. रवि राणा,वि.स.स.
८) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स
९) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
१०) श्री.नवाब मलिक , वि.स.स.
११) श्री.विलास लांडे , वि.स.स.
१२) श्री.शिवेंद्रसिंह भोसले , वि.स.स.
१३) श्री.संजय सावकारे ,वि.स.स.
*(१४) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.,(दि.२० ऑक्टोबर, २०१० रोजी पर्यंत)
(१४ अ) प्रा.राम शिंदे, वि.स.स.(दि.२० ऑक्टोबर,२०१० रोजी पासून)
१५) श्री.गिरीष महाजन,वि.स.स.
१६) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
१७) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
१८) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
१९) श्री.एकनाथ शिंदे , वि.स.स.
२०) श्री.बाळा नांदगावकर , वि.स.स.
२१) श्री. सुरेशदादा देशमुख, वि.प.स.
२२) श्री.भाई जगताप, वि.प.स.
**२३) श्री. राजेंद जैन , वि.प.स.(दि.५ डिसेंबर,२०१० रोजी पर्यंत)
२४) श्री. विनोद तावडे, वि.प.स.
२५) डॉ. दिपक सावंत, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४/२/२०१० रोजी विधानसभा व दिनांक २/३/२०१० रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री भा. ना. कांबळे, सह सचिव
३) श्रीमती मेघना तळेकर, अवर सचिव.
४) श्री. ऋतूराज ज. कुडतरकर, अवर सचिव
५) श्री.आर.आर.काठे,अवर सचिव (समिती)
६) श्री.एस.एन.सानप, कक्ष अधिकारी

***श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी आपल्या समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर प्रा. राम शिंदे, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष ,महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

****श्री.राजेंद्र जैन,वि.प.स.यांची दिनांक ५ डिसेंबर,२०१० रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे सदरची जागा रिक्त आहे.**

(दोन)
प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००४-२००५ च्या विनियोजन लेख्यावरील आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी समितीचा दुसरा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

समितीने सन २००४-२००५ या वर्षाच्या महाराष्ट्र शासनाच्या विनियोजन लेख्यांमध्ये नमूद केलेला अतिरिक्त खर्च व बचतीच्या रक्कमांचा तसेच इतर बाबींवरील खर्चाच्या नियंत्रणाबाबत विचार केला असून त्यानुसार समितीचा हा दुसरा अहवाल विधानमंडळाला सादर करण्यात येत आहे.

समितीच्या बैठका दिनांक ४ मे, ५ मे व दि. १२ मे, २६ मे २०१० रोजी व दि.९ जून, २०१०, रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आल्या. तसेच दिनांक २९ जून, २०१० रोजी प्रादेशिक वन विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक आंबोली (जिल्हा सिंधुदुर्ग) शासकीय विश्रामगृह येथे घेण्यात आली.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकींच्या कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "एक" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने या अहवालाचे प्रारुप सोमवार दिनांक १३ डिसेंबर, २०१० रोजी संमत केले.

उक्त अहवालाच्या संदर्भात समितीने बैठकीच्या वेळी अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, वने विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग,प्रधान सचिव, नियोजन विभाग, प्रधान सचिव, उद्योग विभाग, तसेच संबंधित विभागांच्या प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या त्याचप्रमाणे सचिव, वित्त विभाग (ले. व को.), प्रधान महालेखाकार (ले. व प.)-१, मुंबई, महालेखाकार (ले. व प.)-२, नागपूर, यांनी ही समितीच्या बैठकींना वेळोवेळी उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि इतर संबंधित विभागांच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला जी माहिती दिली, त्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

विधान भवन,
मुंबई/नागपूर.
दिनांक : १३ डिसेंबर, २०१०

गिरीश बापट,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

(तीन)

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
(१)	अतिरिक्त खर्च नियमानुकूल करणे (एक) अतिरिक्त खर्च २००४-२००५	
	सन २००४-२००५	
(२)	महसूल व वन (वने) विभाग : राज्यातील वनक्षेत्र वाढविणे व अस्तित्वात असलेल्या वनक्षेत्राचे संवर्धन करणे .	
(३)	नियोजन विभाग : रोजगार हमी योजने अंतर्गत अपूर्ण असलेली रस्त्याची कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे.	
(४)	सार्वजनिक आरोग्य विभाग : राज्यात रुग्णांना पुरेशी आरोग्य सुविधा मिळत नसतानाही मोठया प्रमाणात बचत करणे.	
(५)	शालेय शिक्षण विभाग : सर्व शिक्षा अभियानाच्या निधीचा योग्य वापर करणे	
(६)	उद्योग ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग : चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर करणे तसेच शासकीय मुद्रणालयांचे आधुनिकीकरण करणे.	

एक (एक) अतिरिक्त खर्च नियमानुकूल करणे
सन २००४-२००५

या अहवालामध्ये समितीने इतरत्र व्यक्त केलेल्या अभिप्रायास अधीन राहून खाली दर्शविण्यात आलेला जादा खर्च नियमानुकूल करण्यासाठी आवश्यक ते उपाय योजण्यात यावेत.

खालील प्रकरणामध्ये दत्तमत वा भारित अनुदान/ विनियोजनाच्या रक्कमेपेक्षा महसूली लेख्यावरील खर्चाची रक्कम अधिक असल्याचे सन २००४-२००५ च्या लेख्यावरुन दिसून येते:-

अ.क्र.	अनुदान/विनियोजनाचे नांव	एकूण अनुदान/ विनियोजनापेक्षा झालेला जादा खर्च (दत्तमत)	एकूण अनुदान /विनियोजनापेक्षा झालेला जादा खर्च (भारित)
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
	सामान्य प्रशासन विभाग		
१.	ए-५ सामाजिक सेवा	६,४२,७९,९६६	५३,९५२
	महसूल वन विभाग		
२.	सी-२ मुद्रांक व नोंदणी	३,२६,२६,७१०	-
३.	सी-५ इतर सामाजिक सेवा	-	२,१३,१४,०४२
४.	सी-७ वन	२,९३,३२,६६७	-
	शालेय शिक्षण विभाग		
५.	ई-१ व्याज प्रदान	-	३,०५,५४,१०५
	वित्त विभाग		
६.	जी-७ सामाजिक सुरक्षा व कल्याण	-	३,९८,३१९
	सार्वजनिक बांधकाम विभाग		
७.	एच-३ गृहनिर्माण	२,१५,०६,०३९	-
	पाटबंधारे विभाग		
८.	आय-१ पाटबंधारे, वीज व इतर आर्थिक सेवा	-	१२,५३,९८३
	विधी व न्याय विभाग		
९.	जे-१ न्यायदान	-	२,४६,४१,७६१
	ग्रामविकास व जलसंधारण विभाग		
१०.	एल-१ व्याज प्रदान		१७,१५,९०,१३८
	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग		
११.	एम-२ सेक्रेटरिएट व इतर आर्थिक सेवा	२६,३४,७३८	
	सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग		
१२.	एन-४ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण	-	२,१५,९२६

१.	२.	३.	४.
	नियोजन विभाग		
१३.	ओ-२ ग्रामीण रोजगार	३,२४,३३,७६,९२४	-
	गृहनिर्माण विभाग		
१४.	क्यु-१ व्याज प्रदान	-	४,०६,९०,१४६
	वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग		
१५.	एस-१ वैघकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य	५,८६,९३,४९८	
	आदिवासी विकास विभाग		
१६.	टी-१ व्याज प्रदान		१४,७८,५९०
	पर्यावरण विभाग		
१७.	यू-१ व्याज प्रदान	-	७३,०३६
	सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग		
१८.	व्ही-२ सहकार	-	८०,१९७
	उच्च व तंत्रशिक्षण विभाग		
१९.	डब्लू-३ तंत्रशिक्षण	१०,४१,९९,७३७	-
	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग		
२०.	वाय-३लहान पाटबंधारे	२८,२८,८६८	
	एकूण ए महसूल लेख्यांवरील खर्च		
		३,५५,९४,७९,१४७	२९,२३,४४,१५९

बी- भांडवली लेख्यावरील खर्च			
	महसूल व वन विभाग		
१.	सी-११ राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण	-	६,८०,३९७
	नगरविकास विभाग		
२.	एफ-५ सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च	-	३,०४,६१,९९९
	पाटबंधारे विभाग		
३.	आय-३ पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च	-	२,०६,१९५
	एकूण बी महसूल लेख्यांवरील खर्च		३,१३,४९,३४७

तळटीप : -- समितीने जेव्हा जादा खर्च नियमानुकूल करण्याविषयी शिफारस केलेली असते, अशा वेळी समितीने यापूर्वी केलेल्या शिफारशीनुसार (सन १९५३-५४ च्या विनियोजन लेख्यावरील अहवालांचा परिच्छेद १० पहा.) ज्यामुळे कोणताही जादा खर्च नियमानुकूल करणे आवश्यक ठरते किंवा टाळता येते अशा प्रकारचे लेख्यांवरील कोणतेही प्रस्थापित गैरवर्गीकरण हिशेबात घेणे आवश्यक आहे. म्हणून अशा प्रकारे गैरवर्गीकरणाच्या रकमा हिशेबात घेऊनच वर दर्शविण्यात आलेल्या रकमा काढण्यात आलेल्या आहेत.

महसूल व वन विभाग

राज्यातील वनक्षेत्र वाढविणे व अस्तित्वात असलेल्या वनक्षेत्राचे संवर्धन करणे :

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाचा विनियोजन लेख्याची छाननी करीत असताना अनुदान क्र.सी-७ खालील प्रधान शीर्ष २४०६ "०१ वनीकरण" अंतर्गत रु. १,८६,०१ इतका अधिक खर्च झाल्याप्रकरणी महालेखापालांनी आपल्या अहवालात पुढील प्रमाणे दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अ.क्र.	शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखांत)	अधिक खर्च (+) बचत (-)
१०१ (०३)(०१) (११)(०१)	वन संधारण व विकास व अग्नीपासून वनांचे संरक्षण मूळ १३,९१,९८ पूरक ४,१५,९३ पुनर्विनियोजन-१,२५.८१	१६,८२.१०	१८,६८.११	+१,८६.०१

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात महसुल व वन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, सदर शीर्षासाठी मूळ रुपये १३,९१,९८,०००/- इतके मूळ अनुदान तसेच पुरक अनुदान रुपये ४,१५,९३,०००/- असे एकूण रुपये १८,०७,९१,०००/- इतके अनुदान मंजुर केले होते. तथापि, पुनर्विनियोजनाने रुपये १,२५,८१,०००/- इतकी रक्कम परत घेतल्याने नियंत्रक अधिकाऱ्यांना रुपये १६,८२,१०,०००/- इतके अनुदान उपलब्ध झाले. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये १८,६८,१०,९०५/- इतका झाला असून रुपये १,८६,००,९०५/- चा अधिक खर्च झाला आहे. वन संरक्षणाच्या दृष्टीने विकासात्मक कामांवर खर्च करणे आवश्यक असल्याने, गुन्हे प्रकरणातील ९०८.३४७ घन मिटर जप्त माल सुरक्षित ठिकाणी हलविण्याचे कामी अचानक खर्च, न्यायालयीन प्रकरणातील ५४ मजूरांच्या मजूरी प्रकरणी करण्यात आलेल्या खर्चमेळ कामकाज तसेच अंतिम अनुदान कमी प्राप्त झाल्याने खर्च जास्त दिसून येत आहे. विभागाचा प्रत्यक्ष खर्च व महालेखापाल यांच्याकडे नोंदविलेला खर्चाच्या आकडयांशी ताळमेळ घातलेला असून तो बरोबर आहे.

अ.क्र.	शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखांत)	अधिक खर्च (+) बचत (-)
०२ ११० (००)(०१) (००)(०२)	पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन वन्यजीवन व निसर्ग संवर्धन व वन्यपशू संरक्षण/वन्यजीव व्यवस्थापन मूळ ११,६७,७६ पूरक -२,५१,६२	९,१६.१४	१२,०३.४३	+२,८७.२९

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधीत महसुल व वन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, सदर शीर्षासाठी मूळ रुपये ११,६७,७६,०००/- इतके अनुदान प्राप्त झाले होते. तथापि पुनर्विनियोजनाने रुपये २,५१,६२,०००/- इतके अनुदान परत घेतल्याने रुपये ९,१६,१४,०००/- इतके अनुदान नियंत्रक अधिकाऱ्यांना उपलब्ध झाले. विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये १२,०३,४३,३५२/- इतका झाल्याने रुपये २,८७,२९,३५२/- चा अधिक खर्च झाला. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात वाजवीपेक्षा जास्त वाढ झाल्याने, मनुष्य, पशुधन, शेतीपिके इत्यादीस झळ पोहचल्यामुळे औषधोपचार व नुकसान भरपाईचा बांधील खर्च विहित मुदतीत करणे अनिवार्य, हत्तीचे आवागमन होत असल्याने "हत्ती रवानगी अभियान मोहिम" राबविण्याचा अचानक खर्च, न्यायालयीन प्रकरणी ११ मजूरांच्या मजूरीचा खर्च, अतिदुर्गम भागासाठी वन कर्मचाऱ्यांना वरिष्ठ श्रेणी दिल्याने फरकाच्या रमकमेचा जादा खर्च यामुळे खर्चात वाढ झाली. विभागाच्या प्रत्यक्ष खर्च व महालेखापाल यांच्याकडे नोंदविलेला खर्चाच्या आकडयांशी ताळमेळ घातलेला असून तो बरोबर आहे.

साक्ष :

समितीच्या दिनांक ४ मे, २०१० रोजी झालेल्या बैठकीत महालेखापालांच्या वन विभागासंदर्भातील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या अभिप्रायाच्या संदर्भात समितीला थोडक्यात माहिती देण्यास वन विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांना सांगितले असता अप्पर मुख्य सचिव यांनी माहिती देताना विशद केले की, सन २००४-२००५ या द्वितीय वर्षासंदर्भात महालेखापालांकडून प्राप्त झालेल्या परिच्छेदासंबंधीची पूर्तता करुन महालेखापाल कार्यालयाकडे एका वर्षाच्या कालावधीत पाठविण्यात आली आहे. त्यानंतर महालेखापाल कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या चुकीच्या नोंदीच्या प्रस्तावाची पूर्तता सुध्दा मुदतीच्या आत करण्यात आली आहे. विभागाचा निधी दोन भागांत खर्च होत असतो. एक पावसाळ्यापूर्वी व दुसरा पावसाळ्यानंतर.

त्याप्रमाणे विभागाचा ३१ कोटी रुपयांचा आऊट-ले होता. त्यापैकी १४ कोटी रुपये खर्च झाले. तसेच केंद्र शासन पुरस्कृत योजनांसाठी ७.३१ कोटी रुपयांचा आऊट-ले होता. त्यापैकी ५.५६ कोटी रुपये खर्च झाले. योजनेच्या खर्चामध्ये २८३ कोटी रुपयांचा आऊट ले होता. त्यापैकी ३०० कोटी रुपये खर्च झाला. तो खर्च कमी करु शकलो नाही. याचे मुख्य कारण म्हणजे नियोजन विभागाकडून मे महिन्यात कपात करण्यात आली होती. त्यानंतर डिसेंबर महिन्यात त्यांच्यकडून पुनः पत्र पाठवून सदरहू निर्बंध उठविण्यात आले होते.

प्राप्त लेखी स्पष्टीकरणाच्या अनुषंगाने जप्त केलेला माल सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी अचानकपणे खर्च होणे, न्यायालयीन प्रकरणातील मंजूरी प्रकरणी ५४ मजुरांच्या कमी अनुदान प्राप्त असताना सुध्दा जास्त खर्च झाल्याचे दिसून येत आहे. याबाबत समितीला सविस्तर माहिती देण्यास यावी असे सांगण्यात आले त्यावर विभागीय सचिवांनी त्यांच्या विभागाला १६ कोटी ८२ लाख १० हजार इतका निधी प्राप्त झाला असून विभागाचा प्रत्यक्ष खर्च रुपये १८ कोटी ६८ लाख १० हजार ९०५ इतका झालेला आहे. म्हणजे १ कोटी ८६ लाख ९०५ इतका जास्तीचा खर्च झालेला आहे. वेतनासाठी ७२४ लाख रुपयांची तरतूद होती त्यापैकी ७६८ लाख रुपये खर्च झालेला आहे. म्हणजे ४३ लाख ५३ हजार इतका जादा खर्च झालेला आहे. वेतनेतर अनुदान ९५७ लाख रुपये होते त्यापैकी १०२६ लाख रुपये खर्च झाला म्हणजे ६८ लाख रुपये जादा खर्च झालेला आहे. एकूण १ कोटी १२ लाख रुपये जादा खर्च झालेला आहे. त्याशिवाय न्यायालयाच्या निर्णयानुसार संबंधितांना निधी द्यावा लागतो असे स्पष्टीकरण केले.

पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन या शीर्षाखाली रु. २ कोटी ८७ लाख २९ हजार ३५२ इतका जास्तीचा खर्च झाल्याचे दाखविण्यात आले आहे. विभागाच्या स्पष्टीकरणात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात वाजवीपेक्षा जास्त वाढ झाल्याने, मनुष्य, पशुधन, शेतीपिके इत्यादीस झळ पोहोचल्यामुळे औषधोपचार व नुकसान भरपाईचा बांधील खर्च विहित मुदतीत करणे अनिवार्य, हत्तीचे आवागमन होत असल्याने "हत्ती रवानगी अभियान मोहिम" राबविण्याचा अचानक खर्च, न्यायालयीन प्रकरणी ११ मजुरांच्या मजुरीचा खर्च, अतिदुर्गम भागासाठी वन कर्मचाऱ्यांना वरिष्ठ श्रेणी दिल्याने फरकाच्या रकमेचा जादा खर्च यामुळे खर्चात वाढ झाली." असे नमूद केले आहे. त्यानुसार विभागाने कोणत्या पिकांसाठी नुकसान भरपाई दिली, कोणत्या प्रकारचा औषधोपचार करण्यात आला, हत्तींच्या हल्ल्यांमध्ये जखमी झालेल्या व मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींना किती मदत देण्यात आली ? अशी विचारणा समितीने केली असता हत्तींच्या हल्ल्यात पाच व्यक्तींचा मृत्यू झाला तर ६६ व्यक्ती जखमी झाल्या. मृत व्यक्तींना २ लाख रुपये तर जखमी व्यक्तींना ५० हजार रुपये मदत दिलेली आहे. नॉर्थचांदासाठी ३० लाख रुपये, नागपूरसाठी २५ लाख रुपये, कोल्हापूरसाठी १५ लाख इतक्या निधीचे वाटप केलेले आहे. अशी माहिती समितीस देण्यात आली. यावर अनेक अभयारण्यामध्ये प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय केलेली नसल्यामुळे वन्य प्राणी गावाजवळ येत आहेत. कर्नाळा अभयारण्य येथील अनेक वन्य प्राणी पाण्यासाठी गावाजवळ येत आहेत. ज्या ठिकाणी राखीव जंगल आहे त्याठिकाणी वन्य प्राण्यांच्या संख्येनुसार तलाव बांधले पाहिजेत जेणेकरुन वन्य प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची

सोय होईल असे समितीने सुचविले असता ताडोबा अभयारण्य व मेळघाट येथे सिमेंट बंधारे बांधले आहेत. यासंदर्भात केंद्र शासनाकडून निधी मिळतो. त्याशिवाय एम.आर.ई.जी.एस.मधून तलावांची कामे घेऊन प्राण्यांसाठी पिण्याची पाण्याची सोय केलेली आहे अशीही समितीस माहिती देण्यात आली.

कर्नाळा अभायारण्य तसेच अन्य अभयारण्यामध्ये वन्य प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय नसल्यामुळे ते जंगलाबाहेर येत आहेत आणि त्यांची शिकार होत आहे. डी.एफ.ओ. (उप वनसंरक्षक अधिकारी) यांना सांगूनही ते तलाव बांधण्यास परवानगी देत नाही. आज झाडांची प्रचंड तोड होत असल्यामुळे जंगले नष्ट होत आहेत. लाकडांची तस्करी मोठ्या प्रमाणावर होत आहे. कोकणात तर वणव्याच्या नावाखाली आगी लावल्या जात आहेत. अशा आगी विझविण्यासाठी वन विभागाकडे कोणत्याही प्रकारची यंत्रणा नाही हे खरे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता राज्याचा आऊट-ले वाढत चालला आहे आणि वन विभागाचा आऊट-ले कमी होत चालला आहे अशी परिस्थिती आहे. राज्याच्या एकूण अंदाजपत्रकाच्या तुलनेत वन विभागासाठी फक्त एक टक्का निधीसुध्दा मिळत नाही. वन विभागाला निधी कमी मिळत असल्यामुळे उपाययोजना करता येत नाहीत. जंगलामध्ये वन्य प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येते. काही ठिकाणी पाण्याची व्यवस्था आहे तर काही ठिकाणी कमी आहे हे मान्य करताना जंगलात आगी लागतात त्या विझविण्यासाठी यंत्रणा नाही. वन विभागाला निधी कमी मिळत असल्यामुळे अशाप्रकारच्या संकटावर मात करण्यासाठी यंत्रणा उभी करु शकत नाही असे स्पष्टीकरण सचिवांनी समितीला दिले.

प्रस्तुत प्रकरणी २ कोटी ८७ लाख २९ हजार इतका जादा खर्च झालेला आहे. या जादा खर्चाचा तपशील व्यक्तीनिहाय दिला आहे काय अशी समितीने विचारणा केली असता सन २००४-०५ मध्ये २७४ व्यक्ती जखमी झाल्या होत्या त्यांना आपण ३२ लाख ६५ हजार इतकी मदत केली, तर मृत व्यक्ती ४९ होते त्यांना सानुग्रह अनुदानापोटी ८१ लाख रुपये दिलेले आहेत. मृत झालेल्या पाळीव प्राण्यांची संख्या २४५४ असून त्यासाठी ६१ लाख रुपये दिले. ३०२.९९ हेक्टर पीक हानीसाठी २ लाख ६४ हजार रुपये देण्यात आलेले आहेत. एकूण १७७ लाख ९६ हजार इतके सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे अशी माहिती समितीस देण्यात आली.

हत्ती वन्य प्राण्यामध्ये केव्हापासून गणला जाऊ लागला असे समितीने विचारता सन २००३-०४ पासून हत्ती वन्य प्राण्यांमध्ये गणला जाऊ लागला यावर हत्ती रवानगी अभियान मोहिमे अंतर्गत किती निधी खर्च करण्यात आला ? याबाबतची माहिती देण्यास विभागीय प्रतिनिधींना सांगण्यात आले. दिनांक ४ मे , २०१० रोजीच्या साक्षीच्या वेळी विभागाकडे सदर माहिती उपलब्ध नव्हती. परंतु विभागाने दि. २३/०६/२०१० रोजीच्या पत्रान्वये खालील माहिती समितीस सादर केली.

सावंतवाडी वनविभागातील दोडामार्ग परिक्षेत्रात माहे ऑक्टोबर २००२ पासून वन्यहत्तींचा वावर सुरु झाला. याबाबतचा मागील ३ वर्षाचा अनुभव विचारात घेता सदरहु हत्ती कर्नाटक राज्यातून सिंधुदूर्ग

जिल्ह्याच्या सीमेवरील अत्यंत दुर्गम भागातून आले व त्यांना तिलारी धरणातील मुबलक पाणी व स्थलांतरीत झालेली ४ गावे यामुळे पोषक वातावरण निर्माण झाले आहे. सुरुवातीस सुमारे ७ च्या संख्येत आलेल्या हत्तींची संख्या सन २००४ मध्ये जवळपास २२ पर्यंत पोहचली. त्यांच्या उपद्रवाची व्याप्ती सुमारे २४ गावात पसरली. यामुळे जनमानसातील भावना तीव्र होवून त्यांनी निवेदने, उपोषणे, मोर्चे या सारख्या मार्गाचा अवलंब होऊ लागला. वनविभागाने ग्रामस्थांना करण्यात येत असलेल्या उपाययोजनांबद्दल वेळोवेळी अवगत केले. गावागावात स्थानिक ग्रामस्थांच्या सहाय्याने पथके नेमूण ढोल, ड्रम, फटाके या सारख्या पारंपारिक साधानांचा वापर करुन पीकांच्या क्षेत्रात हत्तींना जाण्यापासून परावृत्त करण्यात आले. परंतू असे प्रयत्न कमी पडून पीक हानीच्या घटना घडल्या.

दि.२५.११.२००४ ते २९.११.२००४ दरम्यान वन्यहत्ती रवानगी अभियान राबविण्यात आले. अभियानाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१. दिनांक २५/११/२००४ :- तत्कालीन मा.मंत्री (वने) यांच्या उपस्थितीत सदर अभियानास आरंभ करण्यात आला. वन्यहत्तींचे वास्तव्य असलेल्या क्षेत्राच्या सर्वेक्षणाअंती प्राप्त माहितीनुसार मौजे शिरंगे व मौजे बोडदे येथून स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने दोन पथकामार्फत हत्ती रवानगी अभियानास सुरुवात करण्यात आली.

मौजे बोडदे येथील पथकांने बोडदे गावातील १९ ग्रामस्थाना घेऊन त्यांचेशी चर्चा करुन ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार दिनांक २४/११/२००४ रोजी एका हत्तीने ५/६ नारळ झाडांचे नुकसान केल्याची पथकाने खातरजमा करुन त्या हत्तींचा मागोवा घेतला.

सदर हत्ती गावाचे पुर्वेकडील भागातून गेला असलेचे स्पष्ट झालेनंतर त्यानुसार पाहणी करीत असतांना डोंगरामध्ये सुमारे तीन कि.मी. अंतरावर दाट झाडी मध्ये एक सुळेवाला हत्ती दिसून आला. सदर हत्तीस हाका, बांबूच्या चिमटे आणि अग्निबाण व फटाक्यांच्या आवज करीत मौजे मांगेली येथील नैसर्गिक अधिवासात पाठविण्यात आले आहे.

२. मौजे शिरंगे येथील अन्य पथकासोबत प्रशिक्षीत हत्ती नियुक्त करण्यात आले होते हे पथक मौजे शिरंगे गावाच्या उत्तर सीमेवर जमले होते व तेथील ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार पश्चिमेस दोन हत्ती व एक पिल्लू यांनी रात्री बागायतीचे नुकसान केले होते. या माहितीआधारे या हत्तींचा माग काढण्यात आला.

त्यानंतर कुणकी हत्ती, वनकर्मचारी व ग्रामस्थ गांव हद्दीतील धनगरवाड्याच्या दक्षिण दिशेने मार्गस्थ झाले. डोंगर माथ्यावर पश्चिम दिशेला दोन हत्ती व एक पिल्लू यांचा माग शिरंगे राईच्या दिशेने गेल्याचे दिसून आले, त्यानुसार कर्मचारी व ग्रामस्थ यांनी राईच्या दिशेने मागोवा सुरुच ठेवला तेव्हा सदर हत्ती पुर्व दिशेला नदी ओलांडून आग्नेय दिशेकडून गेल्याचे निष्पन्न झाले. बांबूच्या चिमट्या व अग्निबाण यांचा आवाज व हाका करित या पथकाने या तीनही हत्तींना दूर वनक्षेत्रात रोखण्यात यश मिळविले.

३. वरील हत्तींव्यतिरिक्त आणखी सात हत्ती आयनोडे या गावातून तिलारी जलाशय पोहून पार करून पाटये परिसरात असल्याची माहिती होती. यावरुन सकाळी मौजे पाटये येथील ग्रामस्थांशी चर्चा करुन ग्रामस्थांचा चमू तयार करण्यात येवून त्यांचेसोबत वनकर्मचाऱ्यांचे पथक कार्यरत करण्यात आले.

दिनांक २६/११/२००४ :- मौजे मांगेली येथील नैसर्गिक अधिवासात असलेले वन्यहत्ती नागरी वस्तीत व पीक क्षेत्रात येवू नये याकरिता त्यांना पारंपारिक पद्धतीने अधिवासात ठेवण्याचे प्रयत्न करण्यात आले व दिनांक २६/११/२००४ राजी दिवसभरात वा त्या रात्रभरातही या वन्यहत्तींचे कोणतेही पुरावे लोकांना भयप्रत राहतील अशा रितीने आढळून आले नाहीत. यावरुन हे हत्ती त्यांचे नैसर्गिक अधिवासात रवाना झाले आहेत असे निदर्शनास आले. दिवसा नियुक्त करणेत आलेल्या पथकास मौजे शिरंगे ते मांगेली या दरम्यान हत्ती नैसर्गिक अधिवासात परत गेल्याच्या खुणा आढळून आल्या. यावरुन या भागातून दोन दिवसापुर्वी सात हत्ती (वरील प्रमाणे परिच्छेद १ व परिच्छेद २ मध्ये नमुद चार हत्ती) नैसर्गिक अधिवासात गेल्याचे पथकाने स्पष्ट केले. सरपंच मागेली यांचेशी चर्चा करता त्यांनीही त्यांचे गावाचे वस्ती लगत हत्ती नसल्याचे स्पष्ट केले.

४. वरील हत्तींव्यतिरिक्त मौजे पाटये येथे ग्रामस्थ व कर्मचारी यांचे त्या भागातील सात हत्ती नैसर्गिक अधिवासात पाठविणेचे काम सुरु होते व हे क्षेत्र दुर्गम आहे.

दिनांक २७/११/२००४ :- मौजे पाटये गावाचे बुडीत गावाचे आजुबाजूस दिनांक २६/११/२००४ रोजी सुरु करण्यात आलेली मोहिम दिवसभर राबविण्यात आली. रात्री उशिरा परत आलेल्या या पथकाचे अहवालानुसार तीन हत्ती चिरेखण व ओताची मौळी या मार्गाने त्यांचे नैसर्गिक अधिवासात पाठविण्यात सायंकाळपर्यंत यश मिळाले य परिसरात सात ऐवजी तीनच हत्ती होते असे दिसून आले.

त्याचप्रमाणे मौजे मांगेली येथे दोन दिवसांपासून नियुक्त करण्यात आलेल्या पथकांनाही त्या परिसरात वन्यहत्तींचे अस्तित्व गावात वा पीकक्षेत्रात जाणवले नाही.

मौजे बोडदे व खोकरल या भागात हत्तींचा उपद्रव असल्याची दुरध्वनीवर तक्रार प्राप्त झाली. त्याची विशेष तपासणी पथकाद्वारे पाहणी केली असता, वन्यहत्तींचे अस्तित्व जाणवले नाही. दिनांक २८/११/२००४ ला या परिसरात कार्यरत असलेल्या पथकाकडून वन्यहत्तींचे अस्तित्व असल्याबाबतचे संकेत प्राप्त झाले नाही.

५. वनविभागातर्फे मौजे मांगेली, मौजे शिरंगे (पुनर्वसन) व मौजे हेवाळे या गावातील प्रत्येकी स्थानिक सहा ग्रामस्थ व वनविभागाकडील वनमजूर यांचे टेहळणी पथक नियुक्त करणेत आले. एकंदरीत या मोहिमेत एकूण १४ वन्यहत्ती नैसर्गिक अधिवासात गेल्याचे स्पष्ट पुरावे आढळले आहेत. हा एकूण परिसर १०,००० हे. क्षेत्राचा असून खाजगी मालकीचे वन अधिक प्रमाणात आहे.

६. दिनांक २९/११/२००४ :- या परिसरात सौर उर्जा कुंपण तज्ञाचे सर्वेक्षणाचे काम सुरु करणेत आले. दिनांक २५ ते २८/११/२००४ चे कालावधीत एकूण १४ हत्ती नैसर्गिक अधिवासात गेल्याचे स्पष्ट झाले. तसेच याशिवाय आणखी कोणत्याही हत्तींचा वावर आढळून आलेला नाही. तरी सुद्धा या क्षेत्रात एखादा हत्ती

अद्यापही असण्याची शक्यता लक्षात घेवून त्याबाबतची माहिती नियुक्त करण्यात आलेल्या पथकाकडून प्राप्त झाल्यावर कारवाई करणेची तजविज सुरु असलेली वन्यहत्ती रवानगी अभियानाची मोहिम थांबविण्यात आली.

वरील हत्ती रवानगी अभियान राबविण्यासाठी प्रधान शीर्ष २४०६-०७६६ या नियमित शीर्षाखाली उपलब्ध अनुदानामधुन सावंतवाडी वन विभागात सन २००४-०५ मध्ये खालील प्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

अ.क्र.	**खर्चाची बाबत**	**खर्च**	**शेरा**
१	मजुरी	१५८,७७८	हत्ती रवानगी अभियानामधील रोजंदारी मजुरांना आदा केलेली मजुरी रक्कम.
२	कार्यालयीन खर्च	१०,६७४	इतर कार्यालयीन खर्च.
३	साहित्य पुरवठा	३३१,६९५	दोरखंड, फटाके, बॅटरी, मिरची पुड, तेल, अभियानातील कर्मचाऱ्यांसाठी धान्य व इतर साहित्य.
४	इंधन तेल, वंगण	३१,५६८	अभियान मधील वाहनांसाठी इंधन, तेल वंगण इ.
५	इतर खर्च	२०४,२१६	हत्ती हल्यातील मृत व्यक्तीच्या वारसांस रक्कम रु.२.०० लक्ष व पिक नुकसानीच्या १२ प्रकरणातील रक्कम रु. ४२१६/-.
	एकूण	७३६,९३१	

हत्ती रवानगी अभियान मोहिम यासंदर्भातील सिंधुदूर्ग व कोल्हापूर जिल्ह्यातील क्षेत्रीय वन अधिकाऱ्यांसमवेत दि.२९/०६/२०१० रोजी समितीची बैठक झाली. या बैठकीत वन संरक्षक अधिकारी यांनी हत्ती रवानगी अभियान मोहिम राबविण्याबाबत खालीलप्रमाणे सविस्तर माहिती दिली.

पावसाळयात हत्ती डोंगर चढून जाऊ शकत नाही. त्यामुळे पावसाळयाच्या दोन महिन्यात हत्ती बाहेर जाऊ शकत नाहीत. सदर हत्ती मनुष्य वस्तीत जाऊ नयेत म्हणून उपाययोजना करण्यात आल्या आहेत. आता हत्ती टाळंबा धरण परिसरात राहत आहेत. तेथे मनुष्यवस्ती दाट नाही. ज्यांचे नुकसान झाले त्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.मृत व्यक्तींना दोन लाख रुपये देण्यात आले आहेत. दाट लोकवस्तीत हत्ती गेले तर तेथे मनुष्यांचा मृत्यू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हत्ती रवानगी मोहिम राबवितांना जे प्रयत्न केले आहेत त्यामुळे बऱ्याच सुधारणा झाल्या आहेत. टाळंबे धरण परिसरात हत्ती येऊ नयेत म्हणून उपाययोजना करण्यात येत आहेत.

यासंदर्भात एकूण प्रकरणांची संख्या व नुकसान भरपाईची रक्कम यामध्ये तफावत दिसून येते. नुकसान भरपाई कमी मिळत आहे अशा लोकांच्या तक्रारी आहेत. त्याचप्रमाणे अनेक प्रकरणांची नोंद केली जात नाही. अशाही तक्रारी आहेत असे सिमतीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले असता, याबाबत समितीला अवगत करता असे सांगितले की, सर्वच प्रकरणांची नोंद करण्यात येते, १४२१ प्रकरणे आहेत त्यासाठी २८४ लाख रुपयांची नुकसान भरपाई दिली आहे नुकसानीची रक्कम कमी देण्यात आलेली आहे. यासंदर्भातील हिशेब आपण कसा काय केलेला आहे असे समितीने विचारले असता सुरुवातीला हत्तीचे एक कुटुंब होते. त्यामध्ये एक मादी व तिचे एक पिल्लू होते. एक मोठा हत्ती व आणखी एक छोटा हत्ती होता. या हत्तींनी सुपारीची झाडे, माडाची झाडे मोडली होती. सुपारीच्या एका झाडाला १२०० रुपये देण्यात येतात. त्याचप्रमाणे धान पिकाचे नुकसान झाले तर हेक्टरी दोन हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात येते. अशी माहिती देण्यात आली. धान पिकाचे नुकसान झाले तर हेक्टरी दोन हजार रुपये मदत देण्यात येते. ही मदत वाढविण्यासाठी विभागाने कोणते प्रयत्न केले अशी समितीने विचारणा केली. विभागीय प्रतिनिधींने याबाबत सुपारी व माडाची झाडे आदी धान पिकांची जी नुकसान भरपाई देण्यात येते यामध्ये तफावत आहे. तफावत दुर करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. मंत्रीमंडळाच्या बैठकीत यासंदर्भातील निर्णय झाला आहे तथापि याची माहिती अद्याप मिळालेली नाही. धानाच्या पिकाचे नुकासान झाले तर त्यांना २०० रुपये गुंठयाप्रमाणे मदत देण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. नारळाच्या झाडाला दोन हजार रुपये मदत देण्यात येते. त्याप्रमाणे सुपारीच्या झाडाला १२०० रुपये मदत देण्यात येते. या मोहिमेत ज्या लोकांना सहभागी करुन घेण्यात आले होते त्यांना मजूरी देण्यात आलेली आहे अशी माहिती देण्यात आली.

सन २००४ मध्ये ७.३० लाख रुपये हत्ती रवानगी मोहिमेवर खर्च करण्यात आला आहे. हत्ती येऊन जे नुकसान झाले त्याबाबत ५ कोटी ९ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. या संदर्भात अंदाजे ७ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झालेला आहे. त्यातील ५ कोटी ९ लाख रुपये नुकसान भरपाईसाठी देण्यात आले आहेत. ज्या ठिकाणी मनुष्यहानी झाली, लोक जखमी झाले त्यांना ३-४-७ लाख रुपये या प्रमाणे मदत करण्यात आलेली आहे. हत्ती रवानगी मोहिमेवर आजपर्यंत एक कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. यामध्ये ३१ किलोमीटर सोलर कंपाऊंड तयार करण्यात आले आहेत. ६ किलोमीटरच्या परिसरात लोखंडी खांब लावण्यात आले आहेत. पाच-सहा तुकडया यासाठी तयार करण्यात आल्या होत्या. यावर एकूण एक कोटी दोन लाख रुपये खर्च करण्यात आले आहे. हत्तीपासून संरक्षण मिळावे, त्यांची इतरत्र रवानगी करावी, यासाठी ज्या विविध उपाययोजना उदा. सोलर फेन्सिंग, एलिफंट केज, पोल, दगडी भिंती यासाठी १ कोटी २ लक्ष रुपये खर्च करण्यात आलेला आहे. उर्वरित आस्थापनेवरील खर्च ५० लाख रुपये झालेला आहे.

वन्यहत्ती रवानगी अभियानामध्ये बांबूच्या चिमटया, अग्णिबाणाचा आवाज, हाका करणे, वाजंत्री बॅण्ड वाजविणे या कामांसाठी स्थानिक लोकांचे सहकार्य घेण्यात आले आहे. तथापि, ज्यांचे सहकार्य घेण्यात आलेले आहे. त्यांना शासनाने निश्चित केलेल्या किमान वेतन दरानुसार प्रति दिवस रुपये ९०/- याप्रमाणे वेतन देण्यात आलेले आहे. अशी माहिती देण्यात आली.

कर्नाटक राज्यामधून वन्यहत्ती आपल्या राज्यात आलेले आहेत. त्यामुळे कर्नाटक राज्य सरकारशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे का व त्याराज्याने आपल्या राज्याला काही मदत दिलेली आहे का, अशी समितीने विचारणा केली त्यावर माहिती देताना कर्नाटक राज्याशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे सुरवातीच्या काळात कर्नाटक राज्य सरकारने काही मदत केली होती त्या राज्यातील तज्ञ त्यांनी पाठविले होते. त्यानंतरच्या काळात त्या राज्य सरकारचे असे म्हणणे पडले की, "त्यांच्या राज्यात हजारो वन्यहत्ती आहेत व चांगल्याप्रकारे त्यांना सांभाळले जात आहे. महाराष्ट्र राज्यात केवळ काही हत्ती आल्यानंतर महाराष्ट्र राज्य त्यांना सांभाळू शकत नाही का, असे सांगितले. यावर हत्तीची रवानगरी करण्यासाठी राज्य सरकार काही लक्ष रुपयांचा खर्च करीत आहे. पूर्वी सर्कसवाले जंगलातील हत्ती पकडायचे, त्यांना शिकवायचे च सर्कसमध्ये घेऊन यायचे. त्यांची पकडण्याची जुनी पध्दत अशी होती की, ते लोक जंगलामध्ये खंदक खोदायचे, त्या ठिकाणी हिरवा चारा टाकायचे, हत्ती त्यामध्ये पडले की, त्यांना पकडले जायचे व सर्कशीत आणले जायचे, केंद्र शासनाने आता वन्यप्राण्यांच्या सर्कशीतील प्रदर्शनावर बंदी घातली आहे. परंतु हे हत्ती जर लाखो रुपयांचे नुकसान करीत असतील, त्यांच्यामुळे जीवीतहानी होत असेल तर केंद्र शासनाची विशेष परवानगी घेऊन या जुन्या पध्दतीचा उपयोग करण्यास काय हरकत आहे, या दृष्टीने विभागाने काही विचार केला आहे का, अशी समितीने पृच्छा केली. त्यावर जी पध्दत सांगितली आहे. ती सन १९६० पूर्वी वापरण्यात येत होती. त्यानंतर वन्यजीव संरक्षक कायदा सन १९७५ मध्ये पारित झाला. या कायद्यानुसार हत्तींना परिशिष्ट १ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. एखादा बिबटया विहिरीत पडला तर त्याला काढता येते. पण हत्तींचे वजन एवढे असते की, जर ते पडले तर वजनामुळे ते उठू शकत नाहीत. तसेच वजनामुळे पडतांना ह्दयावर अतिरिक्त ताण पडतो व त्यांना ह्दयविकाराचा झटका येऊन ते मृत पावतात. त्यामुळे खंदक खोदून हती पकडण्याची परवानी केंद्र शासनाकडून कधीही मिळणार नाही. आता जे हत्ती रवानगी अभियान राबवित आहोत त्यासाठी राज्य सरकारला केंद्र शासनाची परवानगी घ्यावी लागली होती. ही परवानगी देत असतांना कोणकोणत्या पध्दतीने हत्तींची रवानगी करावी, यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने राज्य सरकारला दिलेल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांअंतर्गतच हे अभियान राज्य सरकारने राबवावयाचे आहे "चिफ कॉन्झरवेटर ऑफ वाईल्ड लाईफ" यांना कलम ११ अनुसार ही परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामध्ये कालावधी देखील निश्चित करुन देण्यात आलेला आहे.

अधिक माहिती देताना अनेकविध उपाय योजूनही हत्तींनी रवानगी करण्यात यश आले नाही त्यावेळी हत्तींना बेशुध्द करण्याची परवानगी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे मागितली व हा प्रस्ताव पाठवित

असतांना फटाके वाजविणे, हाका घालणे, मशाल पेटविणे वगैरे सर्व प्रयत्ना निष्फळ ठरल्याचे व हत्तींमुळे मोठया प्रमाणावर शेतीचे नुकसान होत असल्याचे, जीवित हानी होत असल्याचे ठामपणे केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले व त्यानंतरच केंद्र शासनाने राज्य सरकारला एक विशेष बाब म्हणून हत्तींना बेशुध्द करण्याची परवानगी, काही काळासाठी दिलेली आहे. हत्तींना बेशुध्द करण्यासाठी इंजेक्शन द्यावे लागते. तथापि, इन्जेक्शन देण्याची परवानगी जिल्हा वनसंरक्षक यांना देखील नाही. त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांना पाचारण करावे लागते. एवढे कडक नियम यासंदर्भात आहेत. त्यामुळे खंदक खोदून हत्तींना पकडण्याची परवानगी केंद्र शासनाकडून मिळणार नाही. या निष्कर्शाप्रत वन विभाग आला आहे असे माहिती देताना सांगितले.

आपल्या राज्यामध्ये अलिकडेच हत्तींना वन्यप्राणी म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे व त्यांच्यामुळे होणाऱ्या नुकसानीची नुकसान भरपाई देण्यात येत आहे. हा निर्णय होण्यापूर्वी हत्तींमुळे नुकसान झालेली किती प्रकरणे वन विभागाकडे प्राप्त झाली होती व त्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे का, यापरिसरात नारळ, सुपारी यांच्या मोठया प्रमाणावर बागा आहेत व या बागांचेही नुकसान वन्यहत्तींमुळे झाले आहे नागळ, सुपारीचे रोप लावल्यानंतर त्याची पूर्ण वाढ होऊन साधारणपणे ३ ते ५ वर्षानंतर उत्पन्न मिळण्यास सुरवात होते. मात्र आता जी नुकसान भरपाई देण्यात येत आहे. ती प्रति झाड २०००/- अशा दराने देण्यात येत आहे. नारळाचा विचार केला तर ५-७ वर्षे झाडची जोपासना करावी लागते तेव्हा कुठे उत्पन्न मिळण्यास सुरुवात होते. भाताचे पीक हंगाम निहाय येते. त्यामुळे त्यांना हेक्टरी मदत देण्यात येते. ती योग्य आहे. परंतु, नारळ, सुपारी यांचे नुकसान झाल्यांनतर त्या व्यक्तीस पुन्हा रोप विकत घ्यावे लागते. त्यासाठी खर्च येतो, रोप लावावे लागते त्यासाठी खर्च येतो व त्याच्या जोपासनेसाठी देखील खर्च येतो हा सर्व खर्च त्याला करावा लागणार आहे व पुन्हा उत्पन्न सुरु होण्यास पुढील ३-४ वर्षे वाट पहावी लागते. पर्यायाने ३/४ वर्षाचे उत्पन्नापासून तो वंचित राहतो. त्यामुळे त्यांना नुकसानभरपाई देत असतांना या सर्व गोष्टीचा विचार वन विभागाने केला आहे का, यासंदर्भात विभागाने काही प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला आहे का, तसेच या परिसरातील जनतेला या परिस्थितीतून बाहेर काढावयाचे असेल तर एखादा व्यापक कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यकता आहे असे समितीचे मत झाले.

कर्नाटक राज्यामधून हत्ती महाराष्ट्रात व गोव्यामध्ये आलेले आहेत. त्यामुळे हत्ती अभयारण्य तयार करणे, हत्तींची रवानगी करणे यासाठी महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा या तीन राज्यांनी मिळून एकत्रित उपाययोजना करावी, अशाप्रकारचा विचार उच्च पातळीवर झाला आहे का, जे हत्ती कर्नाटक राज्यामधून आले आहेत ते दोडामार्गपुढे जाण्याची आश्यकता नव्हती. परंतु कोकणामध्ये काही भागात खाणींची कामे सुरु झाली आहेत. खाणींमधील स्फोटांच्या आवाजामुळे हती कुडाळकडे सरकले आहेत, हे हत्ती कुडाळ, ओरसपर्यन्त येण्याचे हेही एक कारण आहे. यासंदर्भातील अहवाल वन विभागाने मंत्रालयात पाठविला आहे का, अशी समितीने विचारणा केली असता यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, शासनाने सन

२००४-२००५ मध्ये जो शासन निर्णय निर्गमित केला आहे त्यामध्ये पुर्वलक्षी प्रभावाने नुकसानभरपाई देण्यात यावी, असे नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे सर्व प्रकरणांचा त्यात समावेश झालेला आहे व नुकसानभरपाई देण्यात आली आहे.वन्यहत्तींच्या गणनेबाबत सांगताना विभागीय प्रतिनिधीनी असे नमूद केले की, हत्तीला मायक्रोचिप बसविण्याचा प्रयोग देखील करण्यात आला होता व एका हत्तीला मायक्रोचिप बसविण्यात आली होती परंतु या मायक्राचिपमुळे फक्त ५० मिटर अंतरापर्यन्तच त्याचा मार्ग काढता येतो. परदेशामध्ये व्हिडीओ यंत्रनेद्वारा हत्तींचा मार्ग ठेवला जातो. उपग्रहाद्वारा हत्ती कोठे जात आहे, कोठे थांबला आहे, इत्यादी संपूर्ण तपशील प्राप्त होऊ शकतो. परंतु एका हत्तीचा माग ठेवण्यासाठी १५ ते २० लाख रुपये खर्च येतो. त्यामुळे आपल्याकडे या पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला नाही. पंरतु वन विभागाने हत्तींच्या हालचालीवरुन त्यांची गणना केली आहे. त्याचप्रमाणे हत्ती ज्या मार्गावरुन जातात त्या मार्गावरील विष्टेवरुनही हत्तींची गणनाकरणे शक्य होते. गणना करण्याची एक शास्त्रीय पध्दत आहे. हत्तीच्या पुढच्या पावलाच्या घेरीपेक्षा त्या हत्तीची उंची दुप्पट असते हत्तींच्या पावलांचे ठसे घेतले जातात व त्याअनुसारही गणना केली जाते. या सर्व पध्दतीनुसार वन विभागाने जी गणना केली आहे ती १०० टक्के बरोबर आहे.

तिन्ही राज्यांनी मिळून संयुक्त कार्यवाही करावी असे समितीने सुचविले असता गोवा, कर्नाटक, व महाराष्ट्र या तिन्ही राज्यांदरम्यान अधिकारी स्तरावर अनेक बैठका झालेल्या आहेत. पूर्वी कर्नाटक राज्याने सहभागी होण्याबाबत संमती दिली होती. तथापि, आता यासंदर्भातील रस कमी झालेला दिसतो तथापि, महाराट्र गोवा या राज्यांदरम्यान सातत्याने बैठका होत असतात माहितीचे आदान-प्रदान होत असते व कार्यवाहीमध्ये देखील एकमेकांना सहकार्य केले जाते.

कर्नाटक राज्यातून आपल्या राज्यात हत्ती आले आहेत. आपल्या राज्यात पोषक वातावरण असल्यामुळे ते इकडे आले आहेत. हत्तींसाठी एखादे अभयारण्य तयार करुन त्या ठिकाणी हत्तींची रवानगी करता येईल काय, याबाबत आपण काही प्रयत्न केले आहेत काय, अशी समितीने विचारणा केली असता. २००८ मध्ये यासंदर्भात चर्चा करण्यात आली होती. आपल्या भागात पोषक वातावरण असल्यामुळे "हत्तीग्राम तयार करण्याची संकल्पना पुढे आली होती. "हत्तीग्राम" तयार करण्यासाठी एका प्रशिक्षक तज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात आले होते त्यांनी असे सांगितले की, "हत्तीग्राम" तयार करण्यासाठी ४०० हेक्टर जागा लागेल, त्यासाठी जवळपास ४० कोटी रुपये खर्च येईल. या संकल्पनेला शासन स्तरावरुन आवश्यक तो प्रतिसाद न मिळाल्यामुळे अशा प्रकारचे "हत्तीग्राम" तयार होऊ शकले नाही अशी माहिती समितीस देण्यात आली.

सिंधुदुर्ग जिल्हयात एकूण किती वन क्षेत्र आहे. त्यामध्ये किती आरएफओ आहेत. किती गार्ड आहेत. आपणास ते पुरेसे आहेत काय? त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे काय? यासंदर्भातील सविस्तर माहिती समितीस देण्यास सांगितले असता, सिंधुदुर्ग जिल्हयांचे विभाजन सहा रेंज मध्ये केले आहे. त्यामध्ये २७ परिमंडळे आहेत. ही परिमंडळे दूरवर आहेत. एक मोबाईल व्हॅन आहे. यामध्ये ३५ वनपाल आहेत. तसेच १७ वनरक्षक आहेत. उप वन संरक्षकाचे एक पद आहे. सिंधुदुर्ग जिल्हयासाठी एक

स्पेशल फोर्स नियुक्त केला आहे त्यामध्ये एक एसीएफ, दोन आरएफओ, सहा वनपाल, वीस वनरक्षक अशा प्रकारे स्पेशल फोर्सची नियुक्ती करण्यात आलेली आहे वन विभागाकडे कर्मचारी संख्या कमी असून ती वाढविण्याची आवश्यकता आहे अशी समितीस माहिती देण्यात आली.

अभिप्राय व शिफारशी :

पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन या शीर्षाखाली रु.२,८७.२९ लाख एवढा जास्त खर्च झाल्याचे दिसून आले विभागाने स्पष्टीकरण देताना वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांत वाजवीपेक्षा जास्त वाढ झाल्याने, मुनष्य, शेतीपिके पशुधन इ. झळ पोहोचल्यामुळे औषधोपचार व नुकसान भरपाईचा बांधील खर्च विहित मुदतीत करणे अनिवार्य होते असे सांगितले. तसेच हत्ती रवानगी मोहिमे अंतर्गत अचानक झालेला खर्च, अतिदुर्गम भागासाठी वन कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी दिल्याने फरकाची रक्कम देण्यात आली.

.राज्यामध्ये विदर्भ व कोकण या प्रदेशामध्ये अधिकतर भाग वनक्षेत्राने व्यापलेला आहे. या वनक्षेत्रांमध्ये वन्य प्राण्यांसाठी अभयारण्ये राखून ठेवण्यात आली आहेत. या अभयारण्यामध्ये प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय केलेली आहे. तथापि, **वन्य प्राण्यांच्या संख्येनुसार व वन क्षेत्रफळानुसार तलाव नसल्यामुळे वन्य प्राणी गावाजवळ येत आहेत. ताडोबा व मेळघाट येथे सिंमेट बंधारे बांधण्यात आलेले आहेत तसेच यासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होत असतो.परंतु घनदाट व राखीव जंगलात वन्य प्राण्यांचे वास्तव्य मोठया संख्येने होत असल्यामुळे या ठिकाणी वन्य प्राण्यांच्या संख्येनुसार पिण्याच्या पाण्यासाठी तलाव बांधण्यात यावेत व यासाठी आवश्यक ती उपायोजना करावी अशी समितीची शिफारस आहे.**

वन्य प्राणी जंगलातून मनुष्य वस्तीजवळ येण्यास आणखी असे कारण आहे की, शहरीकरण अतिशय वेगाने होत आहे. मोठी शहरे, लहान शहरे यांमध्ये बांधकामे होत असल्याने यासाठी आवश्यक असणाऱ्या लाकडीकरीता जंगलातील वृक्षांची बेसुमार व प्रचंड तोड होत असल्यामुळे जंगले झपाट्याने नष्ट होत चालली आहेत. लाकडांची तस्करी होणे व वणव्याच्या नावाखाली जंगलांना आगी लावणे ही कारणे देखिल राज्यातील वनक्षेत्र कमी होण्यामागील कारण आहे. लाकडांची मोठया प्रमाणातील होणारी तस्करी व लावण्यात येणाऱ्या आगी रोखण्यासाठी वन विभागाकडे यंत्रणेचा अभाव तसेच अपुरा कर्मचारी वर्ग दिसून आला. **राज्याचा आऊट-ले वाढत आहे. परंतु वन विभागाचा आऊट-ले कमी होत चालल्याचे साक्षीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले. पर्यावरणांचे ढासळत चाललेले संतुलन रोखण्यासाठी वन क्षेत्र वाढविणे यासाठी वन विभागाकडून सर्वांच्या अपेक्षा वाढत आहेत. परंतु वन विभागास निधीची कमतरता असल्यामुळे उपाययोजना करणे शक्य होत नाही. राज्याचे सध्याचे वनक्षेत्र वाढल्यास तसेच अस्तित्वात असलेल्या वनक्षेत्राचे संवर्धन केल्यास ढासळत चाललेला पर्यावणाचा संतुलन राखण्यास मदत होईल. या दृष्टीने शासनाने वन विभागास त्यांच्या आवश्यकतेनुसार निधीची तरतूद करुन द्यावी व योग्य प्रमाणात कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन द्यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

सावंतवाडी वनविभागातील दोडामार्ग परिक्षेत्रात माहे ऑक्टोबर,२००२ पसून वन्य हत्तींचा वावर सुरु झाला आहे असे हत्ती रवानगी अभियान मोहिमेची माहिती घेताना समितीच्या निदर्शनास आणण्यात आले. सदरहू हत्ती कर्नाटक राज्यातून सिंधुदुर्ग जिल्हयाच्या सीमेवरील अत्यंत दुर्गम भागातून आले व तिलारी धरणातील मुबलक पाणी व स्थलांतरीत झालेली गावे यामुळे त्यांच्यासाठी पोषक वातावरण निर्माण झाले. सुरुवातीस कमी संख्येने आलेल्या हत्तींनी संख्या सन २००४ मध्ये जवळपास २२ झाली या हत्तींचा उपद्रव वाढल्यामुळे जनमानसातील भावना तीव्र होवून त्यांनी शासनास निवेदने देणे, उपोषणे मोर्चे यासारखे कार्य अवलंबिले. वन विभागाने ग्रामस्थांच्या सहाय्याने पथके नेमून ढोल, ड्रम, फटाके यांसारख्या पारंपारिक साधनांचा वापर करुन पिकांच्या क्षेत्रात हत्तींना जाण्यापासून परावृत्त केले. परंतु असे प्रयत्न कमी पडून पीक हानीच्या घटना घडल्या. विभागाने वन्यहत्ती रवानगी अभियानांतर्गत हत्ती मनुष्यवस्तीत जावून त्यांनी केलेल्या नुकसानाची भरपाई म्हणून मृत व्यक्तींना दोन लाख रुपये दिले आहेत. **परंतु प्रकरणांची संख्या व नुकसान भरपाईची रक्कम यामध्ये समितीस तफावत दिसून आली व नुकसान भरपाई कमी मिळत असल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. अनेक प्रकरणांची नोंद देखील घेतली जात नाही.शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईच्या रक्कमेची तफावत दूर करण्यासाठी आणखी रक्कम शासनाकडून मिळावी याकरीता पाठविलेल्या प्रस्तावावर शासनाने घेतलेल्या निर्णयाची माहिती समितीस प्राप्त झालेली नसल्याने या निर्णयाची प्रत समितीस त्वरित पाठविण्यात यावी. तसेच हत्तींचा संचार ज्या गावांमध्ये/विभागांमध्ये झालेला आहे त्या गावातील/विभागातील शेतकऱ्यांच्या पिकांची व अन्य मालमत्तेच्या नुकसानीची तातडीने पहाणी करुन पंचनामे करण्यात यावे व त्याची एक प्रत संबंधित शेतकऱ्यास देण्यात यावी. तसेच हत्तीमुळे झालेल्या नुकसान भरपाईच्या प्रकरणांची नोंद घेणे बंधनकारक करावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

वन्य हत्ती कर्नाटक राज्यामधून महाराष्ट्रात आलेले आहेत. यासंदर्भात कर्नाटक राज्य सरकारशी पत्रव्यवहार करण्यात आला. त्यांनी सुरुवातीच्या काळात काही मदत केली होती व त्यांच्या राज्यातील तज्ञ पाठविले होते. वास्तविक पहाता वन्यहत्तींचा प्रश्न हा महाराष्ट्र व कर्नाटक व गोवा या तीन राज्यांच्या सीमेवरील नागरीकांसंदर्भात आहे. मुख्य म्हणजे कर्नाटक राज्यामधून वन्यहत्ती महाराष्ट्रात स्थलांतर करीत असल्याने आपल्या राज्यातील नागरीकांना यांचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे **तीनही राज्य सरकारानी वन्यहत्तींचा त्रास संबंधित राज्यांच्या नागरिकांना होवू नये याकरीता आवश्यक तो समन्वय साधणे आवश्यक असून संयुक्तरीत्या वेळोवेळी मोहिमा हाती घेणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा या तीनही राज्याच्या वन विभागाच्या अधिकारांच्या सातत्याने बैठका घेतल्यास माहितीचे योग्य ते आदानप्रदान होईल असे समितीस वाटते व याकरीता शासनाच्या वन विभागाने पुढाकार घ्यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

महाराष्ट्रात पोषक वातावरण असल्यामुळे कर्नाटक राज्यातील हत्ती येथे येतात. हत्तींकरीता अभयारण्य वा हत्तीग्राम तयार केल्यास त्यांचा नागरिकांना उपद्रव होणार नाही. **हत्ती नागरी वस्तीपासून वेगळे होतील. याकरीता वन विभागाने प्रशिक्षीत तज्ञाचे मार्गदर्शन देखील घेतले होते. परंतु हत्तीग्राम करण्यास ४०० हेक्टर जागा व रु.४० कोटी खर्च अपेक्षित असल्यामुळे या संकल्पनेस शासन स्तरावर**

आवश्यक तो प्रतिसाद न मिळाल्यामुळे हत्तीग्राम तयार होऊ शकले नाही, परंतु दरवर्षी स्थलांतर करणाऱ्या वनहत्तीपासून होणारी मनुष्य व वित्त हानी टाळण्यासाठी वन विभागाने सुचविलेल्या "हत्तीग्राम" संकल्पनेचा शासनाने साकल्याने विचार करावा व त्याकरीता वनजमीन व निधी प्राथम्यक्रमाने उपलब्ध करुन द्यावा अशी समितीची शिफारस आहे.

.....

नियोजन विभाग

रोजगार हमी योजने अंतर्गत अपूर्ण असलेली रस्त्याची कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र. ओ-२ मधील मुख्यशिर्ष २५०५"ग्रामीण रोजगार" अंतर्गत रुपये बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

मुख्य शिर्ष **गौण शिर्ष**	**अर्थसंकल्पीय तरतूद**	**प्रत्यक्ष खर्च रुपये**	**कमी (-) अधिक/ (+)खर्च**
१	२	३	४
	रुपये लाखात		
मागणी क्र ओ-२ मुख्य लेखाशिर्ष- २५०५- ग्रामीण रोजगार ६० इतर कार्यक्रम पंचवार्षिक योजनांतर्गत योजना			
०००(०१) (०१)(०१)			
रोजगार हमी योजना			
मूळ तरतूद...	७१७४९.०० दत्तमत	१०७७१५.३९	+३६४०५.३३
पुरक ...	२५०.०० दत्तमत		
पुनर्विनियोजन	-६८८.९४		
एकूण	७१३१०.०६ दत्तमत		

रुपये ३६,४०५.३३ लाखांचा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, कोणतेही कारण न देता मार्च २००५ मध्ये, परत करण्यात आलेला रु.६८८.९४ लाख इतका निधी अनावश्यक असल्याचे सिध्द झाले, त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २००५)

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे. सन २००४-२००५ या वर्षात मुख्य लेखाशीर्ष २५०५ - ग्रामीण रोजगार योजनांतर्गत मूळ अर्थसंकल्पीय तरतूद रु.७,१७,४९.०० लाख इतकी करण्यात आली. सुधारित तरतूद रु.७१,३१०.०६ लाख इतकी होती. परंतु प्रत्यक्ष खर्च रु.१०७७१५.३९ इतका जादा खर्च झालेला आहे. जादा खर्चाची कारणे पुढीलप्रमाणे -

१) सन २००३-२००४ प्रमाणे सन २००४-२००५ मध्ये सुध्दा टंचाईग्रस्त परिस्थिती निर्माण होती. त्यामुळे मजूरांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली होती, ती मजूर उपस्थिती पुढीलप्रमाणे होती:-

एप्रिल-१०७१९९४	मे-१०९१८९८	जून-८९५१८९
जुलै-४५८१०३	ऑगस्ट- २२५२०४	सप्टेंबर-१९८८६२
ऑक्टोबर-९६९०२	नोव्हेंबर-७६६५०	डिसेंबर-१४३३३६
जानेवारी-२२१३३८	फेब्रुवारी-३०५२९९	मार्च- ३७६२३७

याप्रमाणे सरासरी मजूर उपस्थिती ४३३१४३ इतक्या प्रमाणात होती. या वाढीव मजूरांची मजूरी देण्याकरिता अतिरिक्त जादा खर्च करण्यात आला.

२) सन २००४-२००५ या वर्षाकरिता रोहयोसाठी एकूण रु.७१७.४९ कोटी तरतूद अर्थसंकल्पात केली होती. सदर तरतूद पूरेशी नसल्यामुळे पुरवणी मागणी रु.२५०.०० कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली.

३) महसूल व वन विभागाने दि.८.१२.२००४ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील २२ जिल्हयातील ९३९७ इतकी गांवे टंचाई ग्रस्त म्हणून घोषित केली. टंचाईग्रस्त परिस्थितीमुळे मजुरांना मजूरी त्वरित देण्यासाठी वित्त विभागाने दि.१७.७.२००४, दि.३.१.२००४ व दि. २४.१.२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकाऱ्यांना लेखी हमीच्याद्वारे रक्कम काढण्याचे अधिकार देण्यात आले आहे. वित्त विभागाच्या शासन निर्णय दि.२४.१.२००५ नुसार ही वाढ दि.३१.५.२००५ पर्यंत वाढविण्यात आली.

विभागीय आयुक्त व जिल्हा अधिकारी यांनी त्यांच्याकडे मार्च अखेर शिल्लक रक्कमा असल्याचे कळविल्यामुळे रु.६८८.९४ लाख इतकी रक्कम परत करण्यात आली. तथापि, लेखी हमीद्वारे सादर करण्यात आलेला देयकांचा तपशील न घेतल्याने खर्चात वाढ झाली आहे.

साक्ष :-

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००३-२००४ व २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान मागणी क्रमांक ओ-२ संदर्भात समितीने दिनांक ५ मे २०१० रोजी नियोजन विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २००३-२००४ व सन २००४-२००५ या दोन्ही वर्षांमध्ये तरतुदीपेक्षा अधिक खर्च झाला आहे, त्या बाबतची कारणे काय आहेत व ती रक्कम कोणत्या बाबीवर खर्च झाली आहे, या प्रश्नावर माहिती देताना नियोजन विभागाच्या सचिवांनी असे सांगितले की, सन २००३-२००४ मध्ये एकूण तरतूद १०४८ कोटी रुपयांची होती. त्यापैकी प्रत्यक्ष खर्च १०५५ कोटी रुपये झालेला आहे. त्याच प्रमाणे सन २००३-२००४ व सन २००४-२००५ मध्ये एकूण तरतूद ७१३ कोटी रुपयांची होती व एकंदर खर्च १०७७ कोटी रुपये एवढा झाला. त्या कालावधीत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांना रोजगार हमी योजनेच्या कामांवर अतिरिक्त पैसा खर्च करण्याची परवानगी देण्यात आली होती. त्यावेळी ३६४ कोटी रुपये त्यांनी रोजगार हमी योजनेवर खर्च

केले. या रक्कमेची पुरवणी मागणी मंजूर व्हावयास पाहिजे होती. परंतु त्यावेळी वित्त विभागाने पुरवणी मागणी नाकारली होती. दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे तेव्हा लोकांची कामे होणे आवश्यक होते. या मुद्याच्या संदर्भात महालेखापाल कार्यालयाचेही समाधान झालेले आहे. याबाबत समितीचेही दुमत नाही. परंतु त्यावेळी संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत रस्त्याची कामे सुरु होती, ती कामे अद्यापही पूर्ण झालेली नाहीत. सन २००३-२००४ मध्ये जी रस्त्यांची कामे घेण्यात आली होती. ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासन काय प्रयत्न करणार आहे, अशी समितीने विचारणा केली असता समितीला अशी माहिती देण्यात आली की, रोजगार हमी योजनेमध्ये वेगवेगळी कामे घेण्यात आली होती, परंतु निरनिराळया कारणांमुळे ती कामे अपूर्ण होती. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना कार्यान्वित करण्यात आली तेव्हापासून पूर्वीची रोजगार हमी योजना बंद करण्यात आली. त्यावेळी रोजगार हमी योजने अंतर्गत जी कामे करण्यात येत होती, त्याबाबत राज्य शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना सुचना दिल्या होत्या की, आपआपल्या जिल्हयातील रोजगार हमी योजनेच्या अपूर्ण कामांची माहिती शासनाला त्वरीत कळवावी. त्यानुसार २२ जिल्ह्यांच्या अपूर्ण कामांबाबतच्या याद्या शासनाला प्राप्त झाल्या व त्या जिल्हयातील अपूर्ण कामांसाठी निधी देण्याचा प्रयत्न शासनाकडून करण्यात आला. काही जिल्हयांच्या याद्या उशिरा प्राप्त झाल्यामुळे तेथील कामे अद्याप पूर्ण होऊ शकलेली नाही. अशीही माहिती नियोजन विभागाच्या सचिवांनी समितीला साक्षीच्या वेळी दिली. यावर जी कामे अपूर्ण आहेत ती केव्हा पूर्ण करण्यात येतील, अशी समितीने विचारणा केली असता ज्या कामासाठी राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो ती कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न शासनाकडून करण्यात येत आहे असेही समितीला सांगण्यात आले.

अभिप्राय व शिफारशी :

सन २००३-२००४ व २००४-२००५ मध्ये दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे त्यावेळी जी रक्कम जादा खर्च करण्यात आली, ते योग्य असल्याने या मुद्याच्या संदर्भात समितीचेही समाधान झाले आहे. अशा परिस्थितीत दुष्काळाचा सामना करण्यासाठी जादा रक्कम खर्च करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देणे योग्यच आहे असे समितीला वाटते. दुष्काळी परिस्थितीत जी कामे घेतली ती चांगली आहेत. परंतु रोजगार हमी योजनेअंतर्गत जी रस्त्यांची कामे चालू होती व ती अजून पूर्ण झालेली नाहीत अशी अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने तरतूद करुन ती विहीत कालमर्यादेत पूर्ण करावीत व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी तसेच राज्य शासनाने या कामांना तातडीने निधी उपलब्ध करुन देऊन ती पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करावा, अशी समितीची शिफारस आहे.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना कार्यान्वित होण्यापूर्वी रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरु असलेल्या कामाबाबतची माहिती शासनाने सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून मागविली असता २२ जिल्हा अधिकाऱ्यांनी त्याबाबतची माहिती पाठविली असली तरी उर्वरित मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळता उर्वरित ९ जिल्हाअधिकाऱ्यांकडून शासनाने मागितलेली माहिती न पाठविल्याने रोजगार हमी योजनेच्या

एकूण कामाची माहिती मिळू शकलेली नाही परिणामी राज्यातील अपूर्ण कामाचे स्पष्ट चित्र शासनापुढे पर्यायाने समितीसमोर येवू शकलेले नाही सबब, कोणकोणत्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सदर माहिती पाठविली नाही त्याची कारणे काय आहेत व त्यासंदर्भात शासनाने जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द काय कारवाई केली याबाबतची सविस्तर माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग

राज्यात रुग्णांना पुरेशा आरोग्य सुविधा मिळत नसतानाही मोठया प्रमाणात बचत करणे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र.आर-१ मधील "२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य" अंतर्गत खर्चाची बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.मूळ अनुदनाइतकाही खर्च न करता पुरवणी मागणी करणे :

अ.क्र	मुख्य लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखात)	अधिक खर्च (+)/ बचत (-)
	२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य २२११ कुटुंब कल्याण २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण ३४५४ जनगणना सर्वेक्षण व सांख्यिकी दत्तमत मूळ.....१३६४९१.३३ पुरवणी ८३९५.०७	१४४८८६.४०	१३५४४१.९६	(-) ९४४४.४४
	वर्षभरात परत केलेली रक्कम			६९५८..६३

	भारित मूळ १७.०० पूरक ----	१७.००	७.४१	-९.५९
	वर्षभरात परत केलेली रक्कम			९.५०

टीपा व भाष्ये :- १) मूळ तरतूदी इतकाही खर्च झाला नाही. रु.८३९५.०७ लाखांचे पूरक अनुदान अनावश्क असल्याचे सिध्द झाले आणि ही लाक्षणिक मागणी निर्बंधित करता आली असती

२) रु.९४४४.४४ लाखाची अंतिम बचत असतांना, मार्च २००५ मध्ये फक्त रु.६९५८.६३ लाख इतकी रक्कम परत करणे अपेक्षित होते.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य या प्रमुख लेखाशीर्षांतर्गत राज्य शासनाने पुनर्विनियोजनाच्या निर्णयान्वये वाढ व घट विचारात घेऊन रु.१२२११२.९५ लाख एवढे अंतिम सुधारीत अनुदान मंजूर केले होते.या अनुदानातून प्रत्यक्ष खर्च रु.१२०३५५.३४ लाख एवढा खर्च झाला आहे. या उपशीर्षातंर्गत एकूण बचत रु.१७५७.६१ लाख एवढी बचत झाली आहे. ही बचत अत्यल्प म्हणजेच १.४३% आहे. झालेल्या बचतीची कारणे उपशीर्षनिहाय स्वतंत्रपणे दिली आहेत.

एकूण बचत १.४३% असलेने कृपया क्षमापन व्हावी.

ज्ञापन:

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, लेखाशीर्षातर्गत राज्यातील अपघात झालेल्या वाहनांची नुकसान भरपाईपोटी मा.न्यायालयाच्या आदेशानुसार नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात येते.सदर योजनेअंतर्गत मूळ अनुदान रु.१५.०० लाख असून त्यापैकी रु.२.०० लाख इतके अनुदान राज्य कामगार विमा योजना यांचे कार्यालयाचे माहे सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.बीयूडी-१००५ प्र.क्र.१५१ (१) अर्थसंकल्प दिनांक १५.३.२००५ अन्वये अंतिम सुधारीत अनुदान रु.७.५० लाख इतके मंजूर करण्यांत आलेले आहे. या लेखाशीर्षातंर्गत वाहन अपघात न्यायालयीन प्रकरणी मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार रक्कमा अदा करण्यात आलेल्या असून बचत रु.०.०९ लाख (रु.७.५०-रु.७.४१ लाख) म्हणजेच १.२०% इतकी अत्यल्प असल्याने क्षमापित व्हावी, ही विनंती.

स्पष्टीकरणास मा.महालेखापाल यांनी पत्र क्र. AAW/Appr-A/CS/2004-05/PHD/ Grant No.R-1/2210/389,dt.31.1.08 अन्वये मान्यता दिली आहे.

अ.क्र	मुख्य लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखात)	अधिक खर्च (+)/ बचत (-)
	२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१ नागरी आरोग्य सेवा- विषयचिकित्सा ००१ संचालन व प्रशासन ००१(०१)(०१) आरोग्य सेवा संचालनालय मुंबई मूळ..... २९०.८० पुरवणी ४७९६.९५ पुनर्विनियोजित ९.८५	५०९७.६०	४८२९.९९	(-) २६७.६१

ज्ञापन:

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, रु.२६७.६१ लाखाची अंतिम बचत लक्षात घेता वेतन, प्रवास भत्ता इत्यादींवरील अधिक खर्च भागविण्यासाठी पुनर्विनियोजनाद्वारे तरतूद केलेला रु.१.३० लाखांचा आणि कोणतीही विनिर्दिष्ट कारणे न देता पुनर्विनियोजनाद्वारे तरतूद केलेला रु.८.५५ लाखांचा निधी अवास्तव असल्याचे सिध्द झाले त्याबाबतची कारणे देण्यांत आलेली नाहीत.

उपशीर्ष २२१० ००९३ अंतर्गत संचालक, सहसंचालक (आरोग्य) तसेच उपसंचालक आरोग्य सेवा, ठाणे, नाशिक, पुणे, नागपूर या मंडळातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावर खर्च केला जातो.

२२१० ००९३ लेखा शीर्षातंर्गत जादा झालेला खर्च रु.२१.३४ लाख हा मुख्यत: वेतन या बाबींवर झालेला आहे.

उपशीर्ष २२१० ०११९ अंतर्गत मराठवाडा विकास पॅकेज, विदर्भ विकास पॅकेज, कोकण विकास पॅकेज, पश्चिम घाट माथा विकास पॅकेज व खानदेशन विकास पॅकेज अशा वेगवेगळया विभागांसाठी आरोग्य संस्थांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी रुग्णवाहिका पुरविण्यासाठी व त्यांना औषध साहित्य सामग्री पुरविण्यासाठी खर्च केला जातो. २२१० ०११९ या उपशीर्षांतर्गत रु.२८१.७३ लाख एवढी बचत दिसून येते. बचत ही अनुदानाच्या खर्चास शासनाने ऑगस्ट ०४ मध्ये ५०% कपात लावल्याने खर्च होऊ शकला नाही.शासनाने सदरची कपात डिसेंबर,०४ मध्ये उठविली. परंतु उर्वरित दोन तीन महिन्यामध्ये ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांच्या बांधकामाची कामे पूर्ण होऊ न शकल्याने पूर्णपणे अनुदान खर्च होऊ शकले नाही. तरी झालेली बचत नियामनुकूल व्हावी.

स्पष्टीकरणास मा.महालेखापाल यांनी पत्र क्र.AAW/Appr-A/CS/२००४-०५/PHD/Grant No.R-१/२२१०/३८९,dt..३१.१.०८ अन्वये मान्यता दिली आहे.

अ.क्र	मुख्य लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखात)	अधिक खर्च (+)/ बचत (-)
०१	२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य नागरी आरोग्य सेवा - विषम चिकित्सा ११० रुग्णालये व दवाखाने राज्य योजनांतर्गत योजना ११०-७(०६)(२४) जीवनदायी योजना आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लोकांना वैद्यकीय मदत (२२१० १३११) मूळ..... ३७५.०० पुनर्विनियोजित ५००.०० ८७५.०० ८४८.६४ (-) २६.३६			

ज्ञापन:

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, योजनेमधील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लोकांना ह्दय, मेंदू, किडणीरोपण शस्त्रक्रिया करण्यासाठी हा कार्यक्रम राबविला जातो.

सदर कार्यक्रमांतर्गत रु.८७५.०० लाख अंतिम सुधारीत अनुदान असून प्रत्यक्ष खर्च रु.८४८.६४ लाख झाला असून रु.२६.३६ लक्ष अनुदानाची बचत झालेली आहे. शासनाकडून सुधारीत अनुदान

दि.१५.३.०५ रोजी प्राप्त झाल्याने अनुदान खर्च करण्यांस पुरेसा कालावधी नसल्याने बचत झाली आहे.

स्पष्टीकरणास मा.महालेखापाल यांनी पत्र क्र.AAW/Appr-A/CS/२००४-०५/PHD/Grant No.R-१/२२१०/३८९,dt..३१.१.०८ अन्वये मान्यता दिली आहे.

अ.क्र	मुख्य लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखात)	अधिक खर्च (+)/ बचत (-)
०१	२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य १०१ रोगप्रतिबंध व नियंत्रण १०१(०१)(०५) हिवताप नियंत्रण कार्यक्रम मूळ..... ९८.५२.०२ पुनर्विनियोजन १०,०६.९६	८८,४५.०९	८६,७५.११	(-) १,६९.९८

(एक) रिक्तपंदामुळे वेतनावर झालेल्या कमी खर्चामुळे (रु.७८६.२७ लाख) आणि (दोन) कोणत्याही विनिर्दिष्ट कारणांखेरीज अभिहस्तांकने (रु.२२०.६९ लाख) यामुळे पुनर्विनियोजनाद्वारे रु.१००६.९६ लाखांचा निधी काढण्यात आला

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, सदर योजना राष्ट्रीय हिवताप निर्मूलन करण्यासाठी असून या योजनेअंतर्गत राज्यातील ३९ हिवताप जन्य आजाराचे निदान निर्मूलन केले जाते.

सदर उपशीर्षातर्गत एकूण रु. १६९.९८ लक्ष एवढी बचत झाली असून वेतन या बाबीवर रु. १८७.५७ लक्ष एवढी बचत झाली असून त्याचा तपशील खालील प्रमाणे :

खर्चाची बाब	बचत		जादा खर्च	
१) वेतन	१७८.५८		_	
२) प्रवास खर्च		_		_
३) कार्यालयीन खर्च		_		_
४) पेट्रोल		_		_
५) भाडेपट्टी		_		_
६) जाहिरात प्रसिध्दी		_		_
७) मोटार वाहने	_		_	
८) सामग्री पुरवठा	_		_	
९) संगणक		_		०.३५
		१८०.०६	१०.०८	

मुख्य बचत वेतनावरील असून या योजनेत एकूण ८०० पदे रिक्त असलेने झाली आहे. तरी बचत क्षमापित व्हावी.

स्पष्टीकरणास मा.महालेखापाल यांनी पत्र क्र. AAW/Appr-A/CS/२००४-०५/PHD/Grant No. R-१/२२१०/३८९, dt.३१.१.०८ अन्वये मान्यता दिली आहे.

१६९.९८ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यांत आलेली नाहीत (ऑगस्ट २००५)

अ.क्र	मुख्य लेखाशिर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखात)**	**अधिक खर्च(+)/ बचत (-)**
	२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ००१ संचालन व प्रशासन ००१(०१)(०४) गट वैद्यकीय.अधिकारी मूळ ५३७३.०० सुधारीत ०.०१ पुनर्विनियोजित (+) ७४६.१८	६११९.१९	५८३५.०५	(-) २८४.१४

रु.२८४.१४ लाखांची अंतिम बचत लक्षात (एक) वेतनांवरील अधिक खर्च (रु.३७४.०९ लाख) आणि (दोन) कोणतीही विनिर्दिष्ट कारणे न देणे (रु.३७२.०९ लाख) यामुळे मार्च २००५ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे, तरतूद केलेला रु.७४६.१८ लाखांचा अतिरिक्त निधी अत्याधिक असल्याचे सिध्द झाले. त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २००५)

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, सदर योजनेमधून ८ परिमंडळांतर्गत गट वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतन भत्ते, प्रवास इत्यादी खर्च केला जातो.

सदर उपशीर्षातंर्गत रु.२८४.१४ लक्ष बचत असून पैकी रु.१९९.९० लाखाची बचत वेतनावर, रु.४.१९ लाखाची बचत प्रवासखर्चावर झाली आहे. वेतनाची बचत गट वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मोठया प्रमाणावर रिक्त असल्याने झालेली आहे.

तसेच बचत ४.८४% असल्याने क्षमापित व्हावी.

स्पष्टीकरणास मा.महालेखापाल यांनी पत्र क्र.AAW/Appr-A/CS/२००४-०५/PHD/Grant No .R-१/२२१०/३८९,dt.३१.१.०८ अन्वये मान्यता दिली आहे.

अ.क्र	मुख्य लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखात)	**अधिक खर्च(+)/ बचत (-)**
	२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१ नागरी आरोग्य सेवा विषम चिकित्सा १०२-(१)(२) वैद्यकीय प्र.अधिकारी आयुक्त रा.का.वि.योजना मूळ..... १९१७.८० पुरवणी १२४.१५ पुनर्विनियोजित (-)३१२.२४	१७२९.७१	१७२८.८८	(-)०.८३

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, (एक) वेतन, मोटार वाहने, पेट्रोल, प्रवास खर्च, कार्यालयीन खर्च इत्यादींवर अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाल्यामुळे (रु.२३७.६४ लाख) आणि (दोन) कोणत्याही विनिर्दिष्ट कारणांखरीज अभिहस्तांकने (रु.७४.६४) यांमुळे मार्च २००९ मध्ये प्रत्यर्पणाद्वारे/पुनर्विनियोजनाद्वारे रु.३१२.२४ लाखांचा निधी काढण्यात आला.

अधिदान व लेखा कार्यालय आणि कोषागार कार्यालयांनी दि.२६.६.०५ पासूनची देयके स्विकारणे बंद केल्यामुळे अनुदानात बचत झाली आहे.

साक्ष:

याबाबत दिनांक १२ मे,२०१० रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने अतिरिक्त मुख्य सचिव आरोग्य विभाग यांना अशी विचारणा केली की,मूळ तरतूदी इतका खर्च झालेला नसताना मागील दोन वर्षात व चालू वर्षात पूरक मागणी घेण्याची कारणे काय आहेत ? सदर पूरक मागणी टाळता आली नसती काय? यावर सचिवांनी असे प्रतिपादन केले की, काही शार्षांखाली बचत झालेली आहे व काही शीर्षांखाली जास्त खर्च झालेला आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, सन २००२-२००३, सन २००३-२००४ व सन २००४-२००५ मध्ये मूळ तरतूद शिल्लक असताना पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. त्यावर सचिवांनी खुलासा केला की, दर वर्षी हेच चित्र दिसून येत आहे. काही शीर्षांवर जास्त खर्च झालेला आहे तर काही शीर्षांवर कमी खर्चझालेला आहे. त्यामुळे अंदाज घेवून पुरवणी मागणी सादर केलेली आहे. समितीने सचिवांना सन २००२-२००३ ते २००४-२००५ या आर्थिक वर्षात मूळ तरतूद शिल्लक असताना पुरवणी मागणी का करण्यात आली यासंदर्भातील लेखी माहीती सादर करण्याबाबत सांगण्यात आले होते तथापि त्याबाबतची माहिती समितीला अहवाल तयार करीपर्यंत देखिल

प्राप्त होवू शकली नाही. त्यामुळे यासंदर्भात समितीला आपले अभिप्राय देता आलेले नाहीत. असे नाईलाजास्तव याठिकाणी नमूद करण्यात येत आहे.

सन २००३ मध्ये राज्यात रुग्णालयाच्या इमारतीची सुरु असलेली बांधकामे अनुदानाअभावी अनेक कामे बंद पडत आहेत हे खरे आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, ज्या वर्षात रक्कम शिल्लक राहते ती रक्कम प्रत्यार्पित करण्यात येते. पुढील वर्षी नवीन रक्कम मिळते व कामे सुरु करण्यात येतात. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, सार्वजनिक बांधकाम विभागाने ग्रामीण भागात इमारतीची बरीच बांधकामे अपूर्णावस्थेत सोडली आहेत. असे सचिवांच्या निदर्शनास आणून दिले असता त्याबाबत सचिवांनी खुलासा केला की, नियोजन आणि अंदाजपत्रक तसेच प्रशासकीय मान्यता देण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग करीत असते. जिल्हा पातळीवर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रतिक्षा यादी असते, प्रशासकीय मंजूरी देऊन निधीचे वाटप करण्यात येते. त्याआधारे सार्वजनिक बांधकाम विभागाने ती कामे योग्यरित्या करणे आवश्यक आहेत. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर त्याच वर्षी सार्वजनिक बांधकाम विभागाला निधी दिला जात असेल तर सार्वजनिक बांधकाम विभागाने ती कामे करावयास पाहिजे असते परंतु प्रत्यक्षात तसे होत नसल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने ती कामे अर्धवट केली आहेत, प्रशासकीय मंजूरी दिली आहे परंतु कामे झाली नाहीत अशा कामाबाबतची यादी समितीला सादर करण्याबाबत समितीने सचिवांना सांगण्यात आले. तसेच बांधकाम सुरु झाल्यानंतर काही कामे अपूर्ण राहतात त्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घेण्यात येते काय अशीही समितीने विचारणा केली असता बांधकाम सुरु झाल्यानंतर ते पूर्ण झाले किंवा अपूर्ण आहे याची माहिती घेण्यात येते. तसेच जी अपूर्ण कामे आहेत त्या संदर्भातील सविस्तर टिपणी समितीला सादर करण्यात येईल असा सचिवांनी समितीला आश्वासन दिले. याच अनुषंगाने समितीने सचिवांच्या असे निदर्शनास आणून दिले की, आदिवासी भागासाठी औषधांचा पुरवठा होत नाही. गोळया, इंजेक्शन, रुग्णवाहिका व इतर साहित्य कधीच ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध होत नाहीत. त्यावर सचिवांनी खुलासा केला की, ग्रामीण भागात दवाखान्यात रुग्णवाहिका असणे नितांत आवश्यक आहे, याबाबत विशेष लक्ष घालून कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन सचिवांनी समितीला दिले.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, जीवनदायी योजना आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लोकांना हृदय, मेंदू, किडणीरोपण शस्त्रक्रिया करण्यासाठी हा कार्यक्रम राबविला जातो. या कार्याक्रमाच्या अंमलबजावणीसाठी रक्कम उशिरा प्राप्त होण्याचे कारण काय? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, सन २००४-२००५ मध्ये किडणीरोपणाचे १२, हृदय शस्त्र क्रिया,१२७८, मेंदू संदर्भातील २६ शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. त्यावर समितीने विचारणा केली की, एकूण किती शस्त्रक्रिया झालेल्या आहेत तसचे एकूण किती शस्त्रक्रिया करण्याचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. यासंबंधी रुग्णालयनिहाय माहिती देण्यात येईल असे ही सचिवांनी सांगितले तसेच जीवनदायी योजनेच्या संबंधात काही तक्रारी आहेत जीवनदायी योजनेतील

त्रुटींचा विचार करुन राज्य शासनाने आता नवीन योजना मंजूर केलेली आहे. असेही सचिवांनी समितीला सांगितले.

समितीने अशी विचारणा केली की, हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रम या योजने अंतर्गत ८०० पदे रिक्त असल्याने बचत झाली आहे. हे विचारात घेता सदर पदे रिक्त असण्याची कारणे काय? तसेच पदे रिक्त राहिल्याने योजना राबविण्यावर काय परिणाम झाला तसेच ८०० पदे रिक्त आहेत त्यापैकी हत्तीरोगाच्या संबंधातील डॉक्टरांची किती पदे रिक्त आहेत? यावर सचिवांनी असा खुलासा केला की, हत्ती रोगाच्या संदर्भात १३६३ पदे आहेत त्यापैकी १०३० पदे भरलेली आहेत अणि ३३३ पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याच्या संदर्भातील बंदी आता उठविण्यात आलेली आहे. रिक्त पदे भरण्यात येत आहेत. समितीने राज्यातील हत्ती रोगाच्या निर्मुलना संदर्भात सविस्तर लेखी टिप्पणी देण्याबाबत सचिवांना सूचित केले.

यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, बचत गट अधिकाऱ्यांची पदे रिक्त असण्याची कारणे काय सदरहू पदे रिक्त राहिल्याने कामावर काय परिणाम झाला? याबाबतची सद्यःस्थिती समितीला अवगत असे सचिवांना सांगितले असता यावर सचिवांनी असे नमूद केले की, माणसे कमी होती तसेच, १९८४ पासून तीच अवस्था आहे. If you look at the administration of this Department, you will notice that there are so many vacancies and there are so many other problems also.

नागरी आरोग्य सेवा विषम चिकित्सा व उपलेखाशिर्ष मुख्य लेखाशिर्ष वैद्यकीय प्र-अधिकारी आयुक्त रा.का.वि.योजनेअंतर्गत १७२९.७१ एकून अनुदान असून त्यापैकी प्रत्यक्ष खर्च १७२८.८८झालेला आहे. २६.३.२००५ पासूनची देयके अधीदान व लेखा कार्यालयाने स्वीकारणे बंद केली असल्याचे विभागाने स्पष्टीकरणात नमूद केले आहे हे लक्षात घेता कोणत्या तारेखपर्यंत देयके स्वीकारली जातात अशी समितीने वित्त सचिवांकडे विचारणा केली असता वित्त सचिवांनी खुलासा केला की, साधारणपणे आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवसापर्यंत देयके स्वीकारली जातात. प्रत्येक वर्षी शेवटच्या दिवसापर्यंत देयके तपासून अधिदान व लेखा कार्यालय यांच्याकडे येतात. आता मात्र त्रैमासिक निधी वितरण कार्यपध्दती सुरु केली असल्याचे सचिवांना सांगितले असता त्यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रत्येक सामान्य रुग्णालयाचे लेखा अंतर्गत परिक्षण केले जाते काय? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, स्टाफ कमी असल्यामुळे, लेखा अंतर्गत परिक्षण होऊ शकत नाही. केवळ महालेपालांचे परिक्षण होते. काही बाबींचे विशेष लेखा परिक्षण होत असते म्हणजे काही बाबींच्या संदर्भात विसंगती आढळल्यास त्याचे लेखा परिक्षण करण्यात येते. असेही सचिवांनी समितीला सांगितले.

समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन मुळ तरतूदी इतका खर्च झालेला नसताना मागील दोन आर्थिक वर्षात व चालू आर्थिक वर्षात पुरक मागणी का केली जाते व सदर पुरक मागणी का टाळता

येत नाही याबाबत सचिवांनी समितीसमोर केलेला खुलासा समाधानकारक न वाटल्याने समितीने या संदर्भात लेखी माहिती देण्यास सांगितले असता सदर माहिती समितीचा अहवाल तयार होईपर्यंत देखील समितीला विभागाकडून प्राप्त होवू शकली नाही हे या ठिकाणी समिती खेदाने नमूद करु इच्छिते.

अभिप्राय व शिफारशी :-

समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन समिती या ठिकाणी नमूद करु इच्छिते की **मुळ तरतूदी इतकाही खर्च न करता पुरवणी मागणी होणे म्हणजे प्राप्त अनुदानानुसार करावयाच्या कामाचे व्यवस्थापन योग्य प्रकारे न केल्यामुळेच हे घडले आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे कारण आवश्यक नसताना पुरक मागणी घेतल्यामुळे जो निधी शासनाच्या इतर योजनाकरीता वापरला गेला असता तो विनाकारण अखर्चित राहीला. इत:पर मंजूर निधी व खर्चाचा अंदाज घेऊनच पुरक मागणीचा विचार करावा व प्राप्त झालेला निधी उद्दिष्टे साध्य होण्यासाठी खर्च होईल याची विभागाने दक्षता घ्यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

ग्रामीण भागात रुग्णालयांच्या इमारतींची बरीच बांधकामे अपूर्ण अवस्थेत सोडल्याचे समितीसमोर झालेल्या साक्षीवरुन समितीच्या निदर्शनास आले. वास्तविक पाहता सार्वजनिक आरोग्य विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागास निधी उपलब्ध करुन दिल्यावर रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकामाच्या सद्य: स्थितीबाबत वेळोवेळी आढावा घेऊन बांधकामाच्या पूर्णतेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने सतत पाठपुरावा करणे आवश्यक आहे. आदिवासी भागातील ग्रामीण रुग्णालयामध्ये औषधी साहित्यांचा पुरेसा पुरवठा देखील वेळेवर होत नाही. तसेच उपलब्ध करुन दिला जाणारा औषधी साहित्याचा साठा अतिशय अपुरा असतो. याबाबत देखील विभागाने विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर इतर देखील रुग्णालयातील सुविधांचा लाभ ग्रामीण व आदिवासी भागांतील जनतेला पुरविणे हा शासनाचा उद्देश त्यामुळे सफल होत नाही. **सबब राज्यात जिल्हानिहाय सन २००४-२००५ नंतर बांधकाम सुरु असलेल्या रुग्णालयाच्या इमारती बाबतची संपूर्ण माहिती तसेच ग्रामीण व आदिवासी भागात उपलब्ध करुन देण्यात येत असलेला औषध पुरवठा, गोळया, इंजेक्शन व रुग्णवाहिका या संबंधीची सविस्तर माहिती समितीला तीन महिन्यात सादर करावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

शासनामार्फत राबविण्यात येत असलेली जीवनदायी योजनेअंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लोकांना वैद्यकीय मदत देण्यासाठी असून या योजने अंतर्गत आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लोकांना हृदय, मेंदू, किडणीरोपण इत्यादी सारख्या गंभीर आजारावर शस्त्रक्रिया करण्यासाठी मदत दिली जाते. **सन २००४-२००५ मध्ये किडणीरोपणाची १२, हृदयाच्या १२७८, मेंदूच्या २६ शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. हदय, मेंदू, किडणीरोपण या सारख्या आकस्मिक व गंभीर आजारांच्या उपचाराकरीता शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्णालयात जीवनदायी योजनेअंतर्गत दाखल झालेल्या एकूण रुग्णापैकी किती रुग्णांची शस्त्रक्रियाकरणे**

आवश्यक होते व किती शस्त्रक्रिया केल्या यासंबंधीची जिल्हानिहाय व रुग्णालयनिहाय माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

राज्यात हत्ती रोग निर्मुलन निवारणासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत एकूण १३६३ पदे आहेत त्यापैकी १०३० पदे भरलेली आहेत अणि ३३३ पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याच्या संदर्भातील बंदी आता उठविण्यात आलेली असल्याने सदर पदे सत्वर भरण्यात यावीत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी. हत्तीरोग निर्मूलनासंदर्भात शासनाने केलेल्या उपाययोजनांची व जिल्हानिहाय हत्तीरोगाच्या रुग्णांची संख्या याची सविस्तर माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

आरोग्य सचिवांनी दिलेल्या स्पष्टीकरणात व वित्त सचिवांनी समितीस साक्षीच्या वेळी केलेल्या खुलाशात समितीस तफावत दिसून येते त्याचप्रमाणे साक्षीच्यावेळी समितीने विचारलेल्या मुद्यांची आश्वासित माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे **राज्यात रुग्णांना पुरेशी व समाधानकारक आरोग्य सेवा पुरविण्यात येत नसतांनाही विभागात मोठया प्रमाणात बचत झालेली आहे. विभागाने दिलेली बचतीची कारणेही समितीला संयुक्तिक वाटत नाही. सबब, ज्या अधिकाऱ्यांच्या कालावधीत आरोग्य विभागात लेखाशीर्ष निहाय तसेच त्या अंतर्गत असलेल्या उपलेखाशीर्षात जी बचत झालेली आहे त्यावरुन शासनाकडून मिळालेल्या निधीचा पुरेशा प्रमाणात विनियोग केलेला नाही. या निष्कर्षप्रत समिती आली असल्याने याप्रकरणी जे जे अधिकारी जबाबदार आहेत अशा संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती ३ महिन्यात समितीस सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

समितीला साक्षीच्यावेळी काही मुदयाबाबतची माहिती मागावून देण्यात येईल असे सचिवांनी आश्वासन दिले होते असे असतानाही सदर आश्वासित माहिती समिती आपला अहवाल तयार करीपर्यंत देखील समितीला प्राप्त न होवू शकल्याने त्याबाबतचे आपले अभिप्राय समितीला देता आलेले नाहीत. सबब, आवश्वासित माहिती न पाठविल्याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्याचेविरुध्द कारवाई करावी व त्याबाबतची माहिती देखिल समितीला पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

सर्व शिक्षा अभियानाच्या निधीचा योग्य वापर करणे :

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेखांची छाननी करीत असताना अनुदान क्र.ई-२ सर्वसाधारण शिक्षण अंतर्गत प्रधान शीर्ष २२०२-सर्वसाधारण शिक्षण याखाली रुपये २,०७,५४,२४,०००/- इतक्या रकमेची बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

प्रधान शीर्ष -२२०२

अनुदान क्रमांक ई-२ सर्वसाधारण शिक्षण

१)	शीर्ष		एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) /बचत (-) रुपये
	२२०२, सर्वसाधारण शिक्षण			(रुपये हजारांत)	
	दत्तमत -				
	मूळ.	८१,०६,१६,७०	९०,९०,११,१७	८८,८२,५६,९३	-२,०७,५४,२४
	पूरक	९,८३,९४,४७			
	वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम				१,९३,१४,७९
	भारित -				
	मूळ.....	१५,००	२८,८८	१४,५१	-१४,३७
	पूरक ...	१३,८८			
	वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २००५)				६

टिपा व भाष्ये

१. विनियोजनातील रु.१४.३७ लाखाच्या अंतिम बचतीतून रु.०.०६ लाखांचा निधी वर्षभरात परत करण्यात आला.

२. विनियोजनातील बचत पुढीलप्रमाणे झाली :-

	शीर्ष		एकुण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च(+) बचत (-)
				(रुपये लाखांत)	
८०	सर्वसाधारण				
८००	इतर खर्च				
८०० (०२)(०१)	संकीर्ण				
	मूळ	१०.००	२३.८८	९.६३	-१४.२५
	पूरक	१३.८८			

रुपये १४.२५ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता, रु.१३.८८ लाख इतक्या रकमेची केलेली पूरक तरतूद अनावश्यक होती आणि ती लाक्षणिक मागणी म्हणून नियमात बसविता आली असती.

रुपये १४.२५ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे प्रतिक्षित आहेत

३. शिक्षण उपकर निधी

लेखा वर्ष संपण्यापूर्वी अनुदानित रु. १२१२८.८८ लाखांचा खर्च शिक्षण उपकर निधीकडे हस्तांतरित केला होता.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबधात शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टिकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे. मुख्यलेखाशीर्ष २२०२ सर्वसाधारण शिक्षण या लेखाशीर्षातर्गत मार्च,२००५ मध्ये समर्पित केलेली रककम रु.१,९३,१४,७९ हजार एकूण अनुदानातून वजा केल्यास प्रत्यक्षात एकूण अनुदान

रु.८८,९६,९६,३८
प्रत्यक्ष खर्च रु.८८,८२,५६,९३

एकूण बचत (-) रु.१४,३९,४५ हजार

इतकी आहे एकूण अनुदान रु.९०,९०,११,१७ हजार असून विविध उपशिर्षाखाली झालेली बचत रु.१४,३९,४५ हजार ही ०.१५% इतकी आहे.

"भारित" या उद्दीष्टासाठी खालीलप्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

		मूळ तरतूद	**पुरवणी**	**एकूण**
१	२२०२१३७६	१०,००	१३,८८	२३,८८
२	२२०२२४९९	५,००	--	५,००
एकूण		**१५,००**	**१३,८८**	**२८,८८**

एकूण बचत रु.१४,३७ हजार पैकी २२०२१३७६ या लेखाशीर्षाखाली रु.१४,२५ हजार बचत झाली असून, त्याबाबतची कारणे क्र.६ मध्ये देण्यात आली आहेत. २२०२२४९९ या लेखाशीर्षाखाली रु.१२ हजार बचत झाली असून, त्यापैकी रु.६ हजार समर्पित केले आहे. उर्वरित बचत रु.६ हजार ही प्रत्यक्ष परिगणनेनुसार देय ठरलेल्या रक्कमे इतका खर्च झाल्याने बचत झाली आहे.

साक्ष :

दिनांक २६ मे, २०१० रोजी शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांची सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र.ई-२ संदर्भात साक्ष घेण्यात आली त्यावेळी, मूळ रकमे इतकाही खर्च केलेला नसतानाही पूरक मागणी का केली, तसेच पूरक मागणी कोणत्या आधारे व केव्हा करण्यात आली होती, तसेच उर्वरित सर्वच अखर्चित रक्कम परत न करण्याची कारणे काय आहेत, अशी समितीने विचारणा केली असता शालेय शिक्षण विभागाचे सचिव यांनी अशी माहिती दिली की, याची वेगवेगळी

कारणे आहेत. "२२०२ सर्वसाधारण शिक्षण" यामध्ये साधारणपणे ९०९० कोटी रुपयांची मूळ तरतूद होती आणि खर्च ८८८२ कोटी ५६ लाख ९३ हजार इतका झालेला आहे. यामध्ये अंतिम २०७ कोटी रुपयांची बचत झाली असून त्यापैकी १९३ कोटी रुपये प्रलंबित करण्यात आलेले आहेत. याची वेगवेगळी कारणे आहेत. एक म्हणजे केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये प्राथमिक शाळेच्या खोल्यांचे बांधकाम होते. त्यासाठी ७ कोटी ७० लाख रुपयांची तरतूद केली होती आणि ती संपूर्ण तरतूदच अखर्चित राहिली आणि नंतर ती समर्पित करण्यात आली. शाळेच्या खोल्यांच्या बांधकामास जिल्हा परिषदेकडून प्रशासकीय मान्यता दिली जाते आणि तशी ती मिळाली नाही म्हणून रक्कम समर्पित करण्यात आली. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत वर्ग खोल्यांच्या बांधकामाचा कार्यक्रम घेतला जातो. याबाबतीत प्रत्येक जिल्हा परिषदेने जो अहवाल सादर केलेला आहे, त्याबाबत विभागाला केंद्र शासनाकडे वार्षिक अहवाल सादर करावा लागतो. तेथे योजना मंजूर करणारे मंडळ असून त्यांच्यामार्फत याला मान्यता दिली जाते. यासंबंधातील कार्यक्रम तयार करीत असताना प्रत्येक जिल्हा परिषदेत किती वर्ग खोल्यांची आवश्यकता आहे याची यादी उपलब्ध असते. त्यानुसार त्या-त्या भागातील वर्ग खोल्यांच्या कामाचा समावेश केला जातो. याबाबतीत मार्गदर्शक तत्व असे आहे की, एकूण जेवढया वर्ग खोल्या असतील, त्याच्या ३३ टक्क्यापर्यंत बांधकामावर खर्च करु शकतो. त्यानुसार योजना केली जाते आणि प्रत्येक योजनेचे अंदाजपत्रक तयार करुन त्याला प्रशासकीय मान्यता दिली जाते. परंतु ते देण्यात आलेले नाही.

शाळा खोल्यांच्या कामाला प्रशासकीय मान्यता कोणामार्फत दिली जाते, याला शासन मंजूरी देते काय या समितीने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना शालेय शिक्षण, सचिव यांनी असे सांगितले की, प्रशासकीय मान्यता जिल्हा परिषदेच्या स्तरावर दिली जाते. वार्षिक योजनेमध्ये प्रशासकीय मान्यता नसते. यामध्ये सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे आहेत, त्यानुसार यावर्षी कोणती कामे घेतली जाणार आहेत याचा गोषवारा दिलेला असतो. जर शाळेचे बांधकाम करावयाचे असेल तर प्रत्येक जिल्हयातून यादी घेतली जाते. मग प्रत्येक शाळेच्या बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्याला प्रशासकीय मान्यता दिली जाते.

समितीने सचिवांच्या असेही निदर्शनास आणून दिले की, जवळ जवळ २०० कोटी रुपये परत गेलेले आहेत तसेच या संबंधातील खर्च किती आहे अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी असे सांगितले की, १९३ कोटी रुपये अखर्चित आहेत व यासंबंधातील खर्च ७ कोटी ७० लाख असून ही संपूर्ण राज्याची रक्कम आहे. यावर समितीने बांधकामाच्या संबंधात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून मान्यता दिली जाते. हे खरे आहे काय अशी विचारणा केली असता जिल्हा परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अधिकार नाहीत तर ते जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीकडे आहेत असे समितीला सांगण्यात आले. सभागृहामध्ये २००४-२००५ मध्ये पूरक मागण्या सादर करण्यात आल्या होत्या त्यातील बाब क्र.४७ मध्ये म्हटलेले आहे की जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये वर्ग खोल्यांचे बांधकाम करणे यासाठी ७ कोटी ७७ लाख प्राथमिक शिक्षणासाठी असून या शाळांमधील सर्व खोल्यांचे बाधकाम करण्यासाठी १३ कोटी रुपयांची

गरज आहे. यापैकी केंद्र शासनाने ५ कोटी २३ लाख रुपये दिलेले आहेत आणि उरलेले ७ कोटी ७७ लाख रुपये अद्याप दिलेले नाहीत, म्हणजे आपला जो हिस्सा होता, तो दिलेला नाही. म्हणून केंद्र शासनाकडून अनुदान मिळाल्यानंतर हा खर्च करण्यात येईल. सन २००४-२००५ मध्ये ७ कोटी ७७ लाख रुपयांची तरतूद करणे आवश्यक होते असे समितीने मत प्रदर्शित केले असता यावर, बांधकामासाठी लगेच पैसा आला नाही तर आपला ऑन गोईंग मनी असतो त्या आधारावर मागणी करतो. केंद्र शासनाकडून हिस्सा आल्यानंतर राज्य शासनाकडे राहिलेल्या हिश्यासाठी मागणी केली जाते असे समितीला सांगण्यात आले. सदनामध्ये पूरक मागणी मान्यतेसाठी ठेवत असताना त्या कामासाठी प्रशासकीय मान्यता मिळालेले आहे की नाही ही बाब विचारात घेत नाही काय? सर्वशिक्षा अभियान योजनेमध्ये वर्ग खोल्यांच्या बांधकामाचा अनुशेष आहे आणि त्यासाठी निधी उपलब्ध झालेला नाही त्यामुळे विभागाने केलेले विधान विसंगत आहे असे समितीस वाटते तसेच सर्व शिक्षा अभियानासाठी राज्याला मिळालेले अनुदान परत जाते अशी स्थिती आहे. परिणामी वर्ग खोल्यांच्या बांधकामाचा अनुशेष राहातो एकीकडे निधी उपलब्ध नाही परंतु दुसरीकडे निधी उपलब्ध झाला तरी ते काम पूर्ण होत नाही. जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीच्या सभापतींकडून जर विलंब होत असेल तर त्यामध्ये कशा प्रकारे सुधारणा करता येईल याबाबतीत शालेय शिक्षण विभागाने मागील दोन-चार वर्षाचे विश्लेषण केलेले आहे काय, यासाठी काही उपाययोजना करण्यात येणार आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी समितीला माहिती देताना, असे सांगितले की, ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. जो निधी येतो, तो रोल-ओव्हर होतो. त्यामुळे तो परत जात नाही तर अखर्चित निधी म्हणून आपल्याकडे रहातो आणि पुढच्या वर्षी तो वापरता येतो. सुरुवातीला सर्व शिक्षा अभियानासाठी हा निधी वापरण्यासाठी संमती दिली, तेव्हा आपले सक्सेस परसेंटेज खाली होते. मागील पाच वर्षाचा आढावा घेतला तर अगोदर ५० ते ६० टक्के खर्च होत असे दोन वर्षापूर्वी ९५% खर्च केल्यामुळे महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर होता. यामध्ये पहिला क्रमांक केरळ आणि दुसरा क्रमांक दिल्लीचा होता. यावर्षी सुध्दा आपला खर्च ९५ टक्क्यांवर आहे आपल्या राज्यामध्ये मागील तीन वर्षात सर्व शिक्षा अभियानामध्ये मोठया प्रमाणात प्रगती झालेली आहे. पण अजून यासंबंधातील अनुशेष कमी होत नाही. कारण पैसे उपलब्ध असून सुध्दा ते खर्च होत नाहीत. आपण फक्त एकूण ३३ टक्के योजनेखाली खर्च करु शकातो. आता सर्व शिक्षा अभियानाचा कालावधी वाढवावा लागेल. ही योजना यावर्षी बंद होणार होती. पण "शिक्षणाचा अधिकार" हे तत्व स्विकारल्यामुळे सर्व शिक्षा अभियानाच्या कालावधीमध्ये वाढ करावी लागेल. यातील बरेचसे निकष अतिशय अवघड आहेत उदाहरण द्यावयाचे तर शिक्षक आणि मुलांचे प्रमाण १:३०, १:३५ याप्रमाणे खोल्यांची आणि त्याप्रमाणात शिक्षकांची संख्या वाढणार आहे. मागच्या वर्षी वार्षिक योजनेत ११५० कोटी रुपयांचे आणि यावर्षी केंद्र शासनाने १६७५ कोटी इतका निधी दिला आहे. वर्ग खोल्यांसाठी ७५ टक्के केंद्र शासन आणि २५ टक्के राज्य शासनाचा वाटा होता, पण आता केंद्र शासन ३५ टक्के आणि राज्य शासनाचा वाटा ६५ टक्के झालेला आहे. त्यामुळे राज्य शासनाचा वित्तिय भार फार मोठया प्रमाणात वाढलेला आहे.

सचिवांनी पुढे असेही सांगितले की, राज्य शासनाने केंद्रशासनाला पाठविण्याकरिता सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत एक अहवाल तयार केलेला आहे. तथापि, तो अहवाल सध्या प्राथमिक अवस्थेत आहे, तो अंतिम झाल्यानंतर व त्याची एक मराठी भाषांतरीत प्रत तयार झाल्यानंतर समितीला ती पाठवून देण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीला दिले.

सर्व शिक्षा अभियांनाअंतर्गत राज्यातील जिल्हयामध्ये किती खर्च लागतो या संदर्भात समितीने एक दोन जिल्यातील सर्व शिक्षा अभियांनाअंतर्गत होणाऱ्या खर्चाची टिप्पणी विभागाने देण्याबाबत समितीने सांगितले तसेच ग्रामिण पातळीवर या मोहिमेअंतर्गत कसे काम चालू आहे याकरीता जिल्हा परिषदेच्या शाळामधील शिक्षकांची एक समिती गठीत करुन त्या समितीचे सदस्य या शाळामधील शिक्षकांवर नियंत्रण ठेवण्याकरिता नेमण्यात यावे असे समितीने सूचवले असता यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, या शिक्षकांवर संनियंत्रण ठेवणारे कोणीही नाही. शिक्षकांवर नियंत्रण ठेवण्याकरिता शिक्षकांची समिती गठित केली पाहिजे. राज्यातील सर्व जिल्हापरिषदेच्या शाळांमध्ये सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत कसे काम चालू आहे, विद्यार्थ्यांना कोणत्या दर्जाचे शिक्षण व शिक्षणविषयक सोयी व सवलती दिल्या जातात, या सर्व सोयी सवलती देण्याकरिता जिल्हापरिषदांना शासनाच्या विभागाकडून योग्य वेळी विहित निधी मिळतो की नाही या सर्व गोष्टीची पाहणी व अभ्यास करुन समितीमार्फत शासनाला सविस्तर शिफारस करुन सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत राज्यामध्ये शिक्षणाची मोहिम कशी राबविण्यात येत आहे याबाबतची वस्तुस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

अभिप्राय व शिफारशी :

सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालासंदर्भात अनुदान मागणी व खर्च याची तपासणी केली असता समितीला साक्षीचे वेळी शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी अशी माहिती दिली की, २२०२-सर्वसाधारण शिक्षण या शिर्षाखाली रुपये ९०९० कोटींची तरतूद होती व खर्च ८८८२ कोटी ५६ लाख ९३ हजार इतका झालेला आहे. यामध्ये २०७ कोटींची बचत झाली असून त्यापैकी १९३ कोटी रुपये परत करण्यात आले. त्याची कारणमिमांसा करताना समितीला सांगण्यात आले की, केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये प्राथमिक शाळेच्या खोल्यांचे बांधकामासाठी ७ कोटी ७० लाख रुपयांची तरतूद केली होती व ती संपूर्ण तरतूदच अखर्चित राहिली व नंतर ती समर्पित करण्यात आली. शाळेच्या खोल्यांच्या बांधकामाला जिल्हा परिषदेकडून प्रशासकीय मान्यता दिली जाते व तशी ती न मिळाल्याने अखर्चित रक्कम समर्पित करण्यात आली.

सन २००४-०५ मध्ये पुरक मागण्या सादर करण्यात आल्या त्यातील बाब क्र.४७ मध्ये असे नमूद करण्यात आले होते की, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये वर्ग खोल्यांचे बांधकाम करणे, यासाठी ७ कोटी ७० लक्ष देणे भाग होते जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील सर्व वर्ग खोल्यांच्या बांधकामासाठी रु.१३ कोटींची

गरज होती. त्यापैकी केंद्र शासनाने ५ कोटी २३ लाख रक्कम दिलेली असून उरलेली रुपये ७कोटी ७७ लाख रुपये अद्याप दिलेले नाहीत म्हणजे केंद्राने आपला जो हिस्सा होता तो दिलेला नाही. केंद्र शासनाकडून अनुदान मिळाल्यानंतर हा खर्च करण्यात येईल. केंद्र शासनाकडून हिस्सा आल्यानंतर राज्य शासनाकडून राहिलेल्या हिश्यासाठी मागणी केली जाते त्यामुळे मंजूर असलेल्या अनुदानापैकी शिल्लक अनुदान किती आहे त्यामध्ये आणखी पुरक मागणीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन घेतेवेळी सभागृहात पूरक मागणी सादर करताना त्या कामासाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे की, नाही ही बाब विचारात घेतली जात नाही असे समितीला वाटते सर्वशिक्षा अभियान योजनेमध्ये वर्ग खोल्यांच्या बांधकामाचा अनुशेष आहे त्यासाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध झालेला नाही.

सर्व शिक्षा अभियानासाठी केंद्र शासनाकडून अनुदान मिळते. महाराष्ट्र राज्याला मिळालेले अनुदान परत जाते अशी स्थिती आहे याकामाच्या संबंधातील राज्याचा परफॉर्मन्स केंद्र शासनाच्या दृष्टीने अतिशय खालच्या दर्जाचा आहे. राज्यात एकीकडे खोल्यांच्या बांधकामाचा अनुशेष आहे,परंतु त्यासाठी निधी उपलब्ध नाही तर दुसरीकडे निधी उपलब्ध झाला तरी ते काम पूर्ण होत नाही. या कामात आपण कुठे मागे पडत आहोत आणि जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीकडून जर प्रशासकीय मान्यतेस विलंब होत असेल तर त्यामध्ये कशाप्रकारे सुधारणा करता येईल याबाबत शालेय शिक्षण विभागाने ग्रामविकास विभागाच्या सचिवासमवेत मागिल दोन-तीन वर्षांचा आढावा घेऊन पाऊले उचलली पाहिजेत. योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधी उपलब्ध झाल्यानंतर जलद गतीने कामे झाली पाहिजेत त्यासाठी निश्चित स्वरुपाचे कार्यक्रम व नियोजन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

याच अनुषंगाने सर्वशिक्षा अभियाना अंतर्गत घेतलेल्या शाळा खोल्यांच्या बांधकामाबाबत नियत कालीक आढावा घेण्यासाठी जिल्हा परिषदांनी शिक्षकांची एक संनियत्रण समिती गठीत करुन या समितीमार्फत शाळा खोल्यांच्या अपुर्ण बांधकामाबाबत तसेच खोल्याच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत शालेय शिक्षण विभाग व ग्रामविकास विभाग यांना पाठविण्याची कार्यपध्दती सुरु करावी व याबाबतच्या सविस्तर सूचना सर्व संबंधितांना द्याव्यात व त्याबाबतची माहिती समितीला ३ महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

उद्योग विभाग

चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर करणे तसेच शासकीय मुद्रणालयांचे आधुनिकीकरण करणे :

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र. के-०३ "लेखनसामग्री व मुद्रण" प्रधानशीर्ष २०५८ लेखनसामग्री व मुद्रण याखाली रु.१४० लाख इतक्या खर्चाची बचत झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अनुदान क्र. के-०३ २०५८
"लेखनसामग्री व मुद्रण"

शीर्ष				
२०५८ लेखनसामग्री व मुद्रण		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च रुपये लाखांत**	**बचत/अधिक**
१०१, लेखनसामग्री खरेदी व पुरवठा				
१०१ (००) (०१) शासकीय लेखनसामग्री व भांडार,मुंबई				
मूळ तरतूद	२,२८,१०/-			
पूरक तरतूद	----			
पुनर्विनियोजन तरतूद	(-) ७४.८२	१५३.२८	१,५१.८८	(-) १.४०

(एक) शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यामुळे, वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके व पूरक देयके आक्षेपांसह परत आल्यामुळे अवैतनिक रजा तसेच सामग्री व पुरवठयाची दयके प्राप्त न झाल्यामुळे (रुपये १४.७७ लाख) आणि (दोन) अपेक्षेपेक्षा लेखासामग्रीचा कमी पुरवठा झाल्यामुळे (रु.६०.०५ लाख) मार्च,२००५ मध्ये प्रत्यर्पणाद्वारे/ पुनर्विनियोजनाद्वारे रु.७४.८२ लाख इतका निधी काढण्यात आला.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबधात उद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टिकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की,रु.३३२८०/- हा खर्च १०१७ या लेखाशिर्षाचा असून अधिदान व लेखा कार्यालयाने चुकून सदरचा खर्च हा ००१ (०१) मुद्रण लेखनसामग्री संचालनालय या दुसऱ्या उपशिर्षाखाली नोंदविलेला आहे. अंमित तरतूद आणि विभागाने नोंदविलेला खर्च विचारात घेता रु.८९३६०/- इतकी बचत दिसून येते. ही बचत प्रामुख्याने सामग्री व पुरवठा या उद्दिष्टाखाली अपेक्षित देयके प्राप्त न झाल्याने दिसून येत आहे. त्या अनुषंगाने संचालनालयाचे पत्र क्र. कार्या- ८ब-अ/ खर्चमेळ/ (३९२)/ ६८७ दि.२३ मार्च,२००६ अन्वये शासनास सादर केला. त्यानंतर शासनाने महालेखापाल मुंबई यांना शासनाचे पत्र क्र.विनिले -२०५८/२००४-२००५/(८३९४)/प्रशासन-१, दि.२७/३/२००६ अन्वये सदर चुक दुरुस्ती प्रस्ताव (१) महालेखापाल मुंबई (२) अधिदान व लेखा कार्यालय, बांद्रा, मुंबई यांना दुरुस्तीची नोंद घेण्याकरिता

पाठविण्यात आलेला आहे. मात्र अधिदान लेखा कार्यालयाने सदर खर्चाची नोंद महालेखापाल कार्यालयास न कळविल्याने सदरच्या खर्चात वाढ झालेली दिसून येत आहे.

सन २००४-२००५ या आर्थिक वर्षासाठी या लेखाशिर्षाखाली अंतिम सुधारीत तरतुद रु.१५३.२८ (लाख) करण्यात आली होती. कार्यालयाने नोंदविलेला खर्च रु.१५२.३९ (लाख) इतका असून महालेखापालाने रु.१५१.८८ (लाख) इतका खर्च नोंदविला आहे. त्यामुळे कार्यालय व महालेखापाल यांच्या रु.०.५१ (लाख) ची तफावत दिसून येते. प्रत्यक्ष बचत खर्चामध्ये रु.०.८९ (लाख) इतकीच झालेली असून सदर बचत ही एकूण अनुदानाच्या १ टक्क्यापेक्षा कमी आहे .ही बचत प्रामुख्याने सामग्री व पुरवठा या उद्दिष्टाखाली अपेक्षित देयके विहित वेळेत प्राप्त न झाल्याने झाली आहे.

अनुदान क्र. के-३

२०५८ लेखनसामग्री व मुद्रण

शीर्ष		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च रुपये लाखांत**	**बचत/अधिक**
२०५८ लेखनसामग्री व मुद्रण १०३, शासकीय मुद्रणालये १०३ (००) (०१) शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,मुंबई				
मूळ तरतूद	२०,०१.१६			
पूरक तरतूद	८४.६८			
पुनर्विनियोजन तरतूद (-)	१,९५.७	१८,९०.१४	१८,७८.२०	(-) ११.९४

(एक) शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यामुळे,

(दोन) आक्षेपांसह वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके व पूरक देयके परत आल्यामुळे

(तीन) आर्थिक काटकसरीच्या उपायोजनांमुळे अतिकालिक भत्यावरील खर्च कमी झाल्यामुळे तसेच मार्च, २००५ पर्यत भांडार व प्रतिभूती कागदांची खरेदी करण्याच्या निविदा प्राप्त न झाल्यामुळे मार्च, २००५ मध्ये रु.१९५.७० लाखांचा निधी परत करण्यात आला. अंतिम बचतीचे कारणे कळविण्यात आलेली नाहीत.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबधात उद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की,महालेखापालांचा खर्च रु.२८९६८३/- ने जादा आहे. कारण रु.९९९६५/- हा (०१) वेतन त्याचप्रमाणे (०२) मजूरी भारित खर्चरु.१८९७१८/- एकूण रु.२८९६८३/- अधिदान व लेखा कार्यालयाने चुकून या शिर्षाखाली दर्शविला आहे. म्हणून आवश्यक चुकदुरुस्ती प्रस्ताव संचालनालयाचे पत्र क्र. कार्या ८ब-अ/ खर्चमेळ/(३९२)/६८७ दि.२३ मार्च,२००६ अन्वये शासनास सादर केला असता. त्यानंतर शासनाने महालेखापाल मुंबई याना शासनाचे पत्र क्र.विनिले -२०५८/२००४-२००५/(८३९४)/प्रशासन-१, दि.२७/३/२००६ अन्वये सदर चुक दुरुस्ती प्रस्ताव अधिदान व लेखा मुंबई यांना

दुरुस्तीची नोंद घेण्याकरिता पाठविण्यात आला एकूण प्रत्यक्ष खर्च रु. १८७५३०२०२/-इतका होता. अंतिम सुधारित अनुदानाच्या तुलनेत रु.१४८३७९८/- एवढी बचत झाली आहे. मात्र अधिदान व लेखा कार्यालयाने सदर खर्चाची नोंद महालेखापाल कार्यालयास न कळविल्याने सदरच्या खर्चात वाढ झालेली दिसून येत आहे.

सन २००४-२००५ या आर्थिक वर्षासाठी या लेखाशिर्षाखाली अंतिम सुधारीत तरतुद रु.१८९०.१४ (लाख) करण्यात आली होती. महालेखापालाने रु.१८७८.२० (लाख) इतका असून कार्यालयाने नोंदविलेला खर्च रु.१८७५.३० (लाख) इतका नोंदवला आहे. त्यामुळे कार्यालय व महालेखापाल यांच्या खर्चामध्ये रु.२.९० लाख ची तफावत दिसून येते. प्रत्यक्ष बचत रु.१४.८३ (लाख) इतकी झाली असून सदर बचत ही एकूण अनुदानाच्या १ टक्क्यापेक्षा कमी आहे.अंतीम बचत प्रामुख्याने स्वग्राम प्रवासभत्ता व वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके विहित वेळेत प्राप्त न झाल्याने बचत दिसून येत आहे.

२०५८ लेखन सामग्री व मुद्रण

शीर्ष				
१०१, लेखनसामग्री खरेदी व पुरवठा		**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च (रुपये लाखांत)**	**बचत/अधिक**
१०१ (००) (०४) शासकीय लेखनसामग्री भांडार,औरंगाबाद				
मूळ तरतूद	८२.३३			
पुनर्विनियोजन	(-) २६.६९	५५.६४	५५.३५	(-) ०.२९

अपेक्षेपेक्षा लेखनसामग्रीचा पुरवठा कमी झाल्यामुळे मार्च २००५ मध्ये रुपये २६.६९ लाखांचा निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संबधात उद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की,महालेखापालांनी नोंदविलेला खर्च रु.९०२/- ने जादा आहे. कारण १०५(०३) शासकीय ग्रंथागार, औरंगाबाद या उपलेखाशिर्षा खालील रु.९०२/- इतका खर्च महालेखापाल कार्यालयाने कार्यालयाने चुकून येथे दर्शर्विला होता. त्याबाबत आवश्यक चुकदुरुस्ती प्रस्ताव संचालनालयाचे पत्र क्र.कार्या ८ब-३/ खर्चमेळ/(३९२)/६८७ दि.२३ मार्च,२००६ अन्वये शासनास सादर केला होता. त्यानंतर शासनाने महालेखापाल नागूपर यांना शासनाचे पत्र क्र.विनिले-२०५८/२००४-२००५/(८३९४)/प्रशासन-१, दि.२७/३/२००६ अन्वये सदर चुक दुरुसती प्रस्ताव महालेखापाल नागपुर यांना दुरुस्तीची नोंद घेण्याकरिता पाठविण्यात आला.

सन२००४-२००५ या आर्थिक वर्षासाठी या लेखाशिर्षाखाली अंतिम सुधारीत तरतुद रु.५५.६४ (लाख) करण्यात आली होती. महालेखापालाने रु.५५.३५ (लाख) इतका खर्च नोंदिविला आहे. तर सदर

रक्कमेचे आगविम्याचे देयक हे विमा संचालयानलय कार्यालयाकडून कोषागार कार्यालय याना दि.३१३२००५ पर्यत समायोजन न झाल्यामुळे सदरची बचत झाली आहे.

साक्ष:

विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ९ जून, २०१० रोजी उद्योग विभागाच्या प्रधान सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्यावेळी अधिक माहिती देताना प्रधान सचिवांनी सांगितले की, प्रामुख्याने जी रक्कम प्रत्यार्पित केलेली आहे त्यासंदर्भातील आकडेवारी यामध्ये दिलेली आहे. महालेखाकारांनी नोंदविलेल्या खर्च आणि कार्यालयाने नोंदविलेला खर्च यामध्ये तफावत आहे. सदर चूक दुरुस्त करण्याबाबत महालेखाकार आाणि अधिदान व लेखा कार्यालय यांना सन २००६ मध्ये कळविण्यात आले होते. परंतु असे दिसून येते की, अधिदान व लेखा कार्यालययांनी दुरुस्ती केलेली नाही आणि महालेखाकारांना सुध्दा कळविलेले नाही. दसरा मुद्या घरासा निधीच्यासंदर्भात आहे. काही ठिकाणी महालेखाकारांकडून चुकीने डबल अकाऊंटीग झालेले आहे आणि ते मान्य झालेले आहे. तिसरा मुद्दा असा आहे की, महालेखाकारांचे जे म्हणणे आहे ते आपलयाला काही प्रमाणात मान्य करावे लागेल. अंदाज काढत असतांना पुनर्विनियोजनाची रक्कम वजा करुनही खर्च काही प्रमाणात कमी असल्यामुळे थोडासा अंदाज चुकलेला आहे असे दिसते. आपण ज्यावेळी निधीची मागणी केली त्यावेळी अशी अपेक्षा होती की सामग्री पुरवठयासाठी व इतर प्रयोजनासाठी जे पैसे येतील त्यातून प्रदान ३१ मार्चपर्यत होऊ शकेल परंतु तसे झालेले नाही. त्यामुळे काही प्रमाणात अंदाज चुकलेला आहे यावर असे समितीने विचारणा केली असता ठराविक मुदतीत आपल्याला चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव पाठवावा लागतो. चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविल्यानंतर शासनाकडून ती महालेखाकार किंवा अधिदान व लेखा कार्यालयाकडून त्यांच्याकडे पाठविली जाते. चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव पाठविलेली आहे. परंतु तो अधिदान व लेखा कार्यालयाकडून पुढे महालेखाकार यांना पाठविला गेलेला नाही असे सांगितले. या संदर्भातील वित्त विभागाच्या सचिवांनी त्यांच्या दिनांक १५ जुलै, २०१० रोजीच्या पत्रान्वये अधिक माहिती देताना चुकीच्या नोंदीच्या प्रस्तावाबाबत खालील प्रमाणे दिली आहे.

चुक दुरुस्तीचे प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास पाठविण्याची पध्दत :

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका खंड १ परिशिष्ट ३, परिच्छेद १५७ अन्वये प्रत्येक नियंत्रक अधिकाऱ्याने खर्चाचा तिमाही ताळमेळ घेणे अनिवार्य आहे. ताळमेळा अंती अधिदान व लेखा कार्यालयाने लेखे व नियंत्रक अधिकाऱ्याचे मासिक खर्च विवरणपत्र (M.E.S) यांच्या वर्गिकरणामध्ये तफावत आढळून आल्यास त्वरित पदांतरित नोंद (T.E.) अधिदान व लेखा कार्यालयास सुचवून वर्गिकरणात योग्य तो बदल करुन घ्यायचा असतो. तदांतरित नोंद (T.E.) सुचवुन लेख्यात दुरुस्ती करण्याची सुविधा वित्तीय वर्ष संपल्यानंतर पुरवणी लेखा बंद होईपर्यंत (साधारणतः जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत) उपलब्ध असते.

पुरवणी लेखा २ सादर झाल्यानंतर जर विर्गीकरणामध्ये दुरुस्ती करण्याची गरज निर्माण झाली तर त्यासाठी चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव सादर करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. महालेखापाल यांचे लेखे ३० जून पर्यंत खुले असतात. ३१ जुलैला महालेखापाल प्रत्यक्ष आकडे विभागांना कळवितात. त्यानंतर ६ महिन्यापर्यंत (जानेवारी पर्यंत) विभागांनी चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव अधिदान व लेखा कार्यालयामार्फत सादर करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. विभागांनी अधिदान व लेखा कार्यालयास सादर केलेले चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव अधिदान व लेखा कार्यालय तपासून महालेखापाल कार्यालयाकडे सादर करते. महालेखापाल कार्यालय चुकीच्या नोंदीच्या प्रस्ताव अन्यथा परिपुर्ण असल्यास चुकीची नोंद घेवून तसे संबधिताना कळविते.

उपरोक्त संदर्भिय प्रकरणामध्ये सन २००४-२००५ या आर्थिक वर्षासाठीचा चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव उद्योग विभागाने जानेवारी २००६ अखेर पर्यंत अधिदान व लेखा कार्यालयामार्फत महालेखापाल कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी दि.२७/०३/२००६ रोजी निर्गमित केलेला प्रस्ताव अधिदान व लेखा कार्यालयास दि.२० एप्रिल, २००६ रोजी प्राप्त झाला होता. सदर प्रस्ताव हा महालेखापाल कार्यालय व अधिदान व लेखा कार्यालय या दोन्ही कार्यालयांना सादर करण्यता आला होता. परंतु याबाबत अशी कार्यपध्दती आहे की, महालेखापाल कार्यालयास प्रस्ताव थेट सादर करावयाचा असल्यास जसा संक्षिप्त प्रस्ताव सादर केला जातो. त्या प्रकारचा उद्योग विभागाचा प्रस्ताव होता. अधिदान व लेखा कार्यालयाकडून प्रस्तावाची छाननी होण्यासाठी ज्या प्रकारचा तपशिलवार प्रस्ताव आवश्यक असतो तसा उद्योग विभागाचा प्रस्ताव तपशिलवार नव्हता. सदर प्रस्तावासोबत आवश्यक तपशील (प्रमाणक क्रमांक दिनांक व रक्कम) नसल्यामुळे सदर प्रस्तावाची छाननी करणे शक्य झाले नाही. परिणामी प्रचलित पध्दतीने हा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही झाली नाही. दरम्यानच्या काळात व उद्योग उर्जा व कामगार विभागाकडून देखिल या संदर्भात पाठपुरावा झाला नाही. परंतु प्रस्तावाच्या अपरिपुर्णते बाबत वस्तुस्थिती विभागास न कळविण्याचे अधिदान व लेखाकार्यालयाकडून अनावधानाने राहुन गेले.त्याबद्दल अधिदान व लेखा कार्यालय अत्यंत दिलगिर आहे असे त्यांनी आपल्या खुलाशात नमूद केले आहे.

मुंबईमध्ये खर्च झाला तर चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव अधिदान व लेखा कार्यालयास सादर करावा लागतो. त्यानंतर ती महालेखाकारांकडे पाठविला जातो. असे वित्त सचिवांनी सांगितले महालेखाकार यांनी आपल्या अहवालात नमूद करण्यात आलेल्या रु. ३३,२८०/- आणि रु. २,८९,६८३/- या रक्कमेच्या चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव अधिदान व लेखा कार्यालयास पाठविलेला नाही. त्यावर शासकीय लेखन सामग्री भांडार, मुंबई यांच्या संदर्भात चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव व अधिदान व लेखा कार्यालयामार्फत का पाठविण्यात आली नाही? आपण याबाबत पाठपुरावा केलेला आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता यासंदर्भात जो पाठपुरावा करण्यात आलेला आहे तो महालेखाकारांनी बघितलेला आहे. चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव अधिदान व लेखा कार्यालयाकडून महालेखाकारांना का पाठविण्यात आली नाही किंवा यामध्ये काही चुकामूक झालेली असावी, असे मत वित्त सचिवांनी व्यक्त केले.

बचत प्रामुख्याने सामग्री व पुरवठा या उद्दिष्टाखालील अपेक्षित देयके विहित वेळेत प्राप्त न झाल्याने झाली आहे. यासंदर्भात आपले काय म्हणणे आहे? अशी सचिवांना समितीने विचारणा केली असता त्यावर निविदा काढत असताना विविध विभागाकडून जी अपेक्षित मागणी असते त्यामध्ये काही ठिकाणी कमी जास्त प्रमाणात उशीर होऊ शकतो. निविदा काढल्यानंतर जो पुरवठा होणे अपेक्षित असतो तो होणे आवश्यक आहे. निविदा अंतिम झाल्यानंतर तो पुरवठा ठराविक कालावधीमध्ये उपलब्ध झाला पाहिजे. पुरवठा झाल्यानंतर १० टक्के रक्कम राखीव ठेवण्यात येते. तांत्रिक तपासणी झाल्यानंतर ते देयक अदा केले जाते. काही वेळा पुरवठा उशिरा होतो अशी कारणे यामध्ये समाविष्ट आहेत. त्यामुळे आपण आपल्या अंदाजाप्रमाणे ३१ मार्च पर्यत पूर्ण रक्कम अदा करुन शकलो नाही. यासंदर्भातील १९८२ ची पुस्तिका आहे. १९८२ नंतर कामकाजामध्ये बराच बदल झालेला आहे. उद्योग विभागाच्या कामकाजामध्ये देखील बराच बदल झालेला आहे पुस्तिकेमध्ये दुरुस्ती केली पाहिजे असे शासनाने संचालक, शासकीय मुद्रणालय यांना कळविले आहे. विभागाकडून जी मागणी येते आणि तेथून पुढे जी कार्यवाही सुरु होते त्याबाबत फेरविचार करणे आवश्यक आहे. आम्ही यासाठी समिती नियुक्त केलेली आहे यामध्ये बदल करणे आवश्यक आहे आणि ती प्रक्रिया आम्ही सुरु केलेली आहे तसेच सिक्युरिटी पेपरचा मुद्दा आहे सिक्युरिटी पेपर ठराविक प्रकारचा असतो. सिक्युरिटी पेपरच्या पुरवठादारांची संख्या कमी असते. निविदा काढत असताना इतर पेपरच्या संदर्भात अडचण येत नाही. परंतु सिक्युरिटी पेपर कमी मिळाले किंवा निविदांना पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही तर आपल्याला निविदांना पुन्हा मुदतवाढ देण्याशिवाय गत्यंतर नसते. म्हणून याकडे वेगळया दृष्टीने बघणे आवश्यक आहे. अशी माहिती देण्यात आली.

राज्यात औरगांबाद, नागूपर, पुणे, मुंबई, कोल्हापूर इत्यादी ८ ठिकाणी प्रिंटींग प्रेस आहेत शासकीय अहवाल, मासिक इत्यादी काम शासन बाहेरुन करुन घेते. त्यासाठी शासनाचा बराच पैसा खर्च होतो. शासकीय मुद्रणालयातील मशिनरी अद्यावत नाही. मध्यंतरी बांधा वापरा व हस्तांतरण चा प्रस्ताव होता तेथील कर्मचारी बसून पगार घेतात आणि प्रिंटींगचे काम मात्र बाहेरुन करुन घेतले जाते. मुंबई शहरातील युनिट बांधा वापरा व हस्तांतरण तत्वावर देण्याचा विचार सुरु होता. या संदर्भातील अधिक माहिती समितीस देण्यात यावी असे विभागीय प्रतिनिधींना सांगण्यात आले. त्याअनुषंगाने विभागाच्या प्रधान सचिवांनी सांगितले की, विकास आयुक्त उद्योग विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती त्या समितीमध्ये संचालक आणि तज्ञ लोकांचा समावेश होता. त्यांनी व्यापक आधुनिक कार्यक्रमाचा आराखडा तयार केला होता. त्यामध्ये ८८ कोटी रुपयांची योजना होती. मागील वर्षी त्या आराखडयाचा आढावा घेतला होता त्यावरुन असे दिसते की, स्थापत्य आणि विद्युतकामाचा समावेश केला तर ते अंदाजपत्रक १४५ कोटी रुपयांचे होते. विभाग गेले तीन-चार वर्षापासून आधुनिकीकरणासाठी तरतूद करण्याचा प्रयत्न करीत आहे. आपण उद्योग विभागाची एकदंरीत वार्षिक योजना बघितली तर दरवर्षी राज्य व जिल्हास्तरीय योजनाबाबत ४० ते ५० कोटी रुपये इतकीच रक्कम मिळते. ही रक्कम फक्त प्रिंटींगसाठी नाही तर उद्योग विभागासाठी

मिळते. यासंदर्भात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. वित्त विभागाचे असे म्हणणे होते की, खाजगीकरण करावे, वित्त विभागाचे हे म्हणणे विभागास मान्य नव्हते. विभागाच्या म्हण्यानुसार आधुनिकीकरण केल्यानंतर त्यांच्याकडे जे मनुष्यबळ उपलब्ध आहे त्याचा आपण वापर करु शकतो त्यासाठी दोन मार्गाने प्रयत्न केलेला आहे. बांधा वापरा व हस्तांतरण चा प्रकल्प आहे. अंधेरी, चुनाभट्टी येथे संचालक, शासकीय मुद्रणालय, तसेच उद्योग संचालनालयाची जागा आहे. मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन ती जागा बांधा वापरा व हस्तांतरतत्वावर द्यावी. त्यातून आपल्याला आधुनिकीकरणाच्या कार्यक्रमासाठी ३५ कोटी रुपये अपेक्षित आहेत. मुंबई आणि नागपूर येथे मेजर प्रिंटीग प्रेस आहेत. तेथे आधुनिक मशिनरी खरेदी करावयाची आहे. मागील वर्षी पहिल्यांदा अधुनिकीकरणाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून मशिनरीसाठी काही अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे एकूण योजना लक्षात घेता दरवर्षी ३ ते ५ कोटी रुपये निधी प्राप्त होऊ शकेल. मागील वर्षी अंदाजपत्रकामधून ३ ते ३.५ कोटी रुपये मिळालेले आहेत आणि त्याची पुर्तता झालेली आहे. यावर्षी सुध्दा तेवढीच तरतूद करण्यात आलेली आहे त्याची निविदा काढण्यात येईल. आपल्याला हे टप्याटप्याने करावे लागेल.

बांधा वापरा व हस्तांतर यासाठी जागा कुणाला दिली अशी समितीने विचारणा केली असता या जमिनीवर उद्योग विभागाचे जुने बांधकाम असून तेथे संचालक, शासकीय मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांच्या सदनिकाही आहे. त्या सदनिकांची त्यांनी पुनर्बांधणी करावी. उद्योग संचालनालयासाठी उद्योग भवन बांधावे यामध्ये वेगवेगळया प्रकारच्या सोई असतील उर्वरित भागाचा उपयोग या प्रकल्पाकरीता निधी उभारण्यासाठी विकासकाने करावा अशी योजना आहे. बांधकाम करुन सुध्दा अतिरिक्त रक्कम ३५ कोटी आहे.

उद्योग विभागाचे मुंबई येथील मुद्रणालयासंदर्भात बांधा, वापरा व हस्तांतरण संदर्भातील प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

अभिप्राय व शिफारशी :

समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, लेखनसामग्री व मुद्रण लेखाशीर्ष २०५८ या अंतर्गत महालेखाकारांनी नोंदविलेला खर्च आणि विभागाने नोंदविलेला खर्च यामध्ये तफावत असल्याने याबाबत चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव महालेखाकार यांना सादर न केल्यामुळे रुपये ०.२९ लाख रक्कमेची बचत झाली आहे. अधिदान व लेखा कार्यालयाने चुकून रु.३३२८० हा खर्च ००१(०१) मुद्रण लेखनसामग्री संचालनालय या उपशिर्षाखाली नोंदविलेला आहे. महालेखाकारांनी नोंदविलेल्या खर्च आणि कार्यालयाने नोंदविलेला खर्च यामध्ये तफावत आहे सदर चूक दुरुस्त करण्याबाबत महालेखाकार आाणि अधिदान व लेखा कार्यालय यांना सन २००६ मध्ये कळविणे आवश्यक होते परंतु उद्योग विभागाने तसे केलेले नाही. त्यांनी केवळ अधिदान व लेखा कार्यालयास चुकीची नोंद दुरुस्तीचा प्रस्ताव कळविला आहे व त्याबाबत कोणताही पाठपुरावा केलेला नाही.

त्याप्रमाणे अधिदान व लेखा कार्यालयाकडून प्रस्तावाची छाननी होण्यासाठी ज्या प्रकारचा तपशिलवार प्रस्ताव पाठविणे आवश्यक होते तसा तपशिलवार प्रस्ताव उद्योग विभागाचा नव्हता तसेच सदर प्रस्तावासोबत आवश्यक तपशील (प्रमाणक क्रमांक दिनांक व रक्कम) नसल्यामुळे सदर प्रस्तावाची छाननी करणे शक्य झाले नाही. परिणामी प्रचलित पध्दतीने हा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही झाली नाही. तसेच उद्योग विभागाकडून देखिल या संदर्भात पाठपुरावा झाला नाही. परंतु प्रस्तावाच्या अपरिपुर्णते बाबत वस्तुस्थिती विभागास न कळविण्याचे अधिदान व लेखाकार्यालयाकडून अनावधानाने राहुन गेले ही बाब देखील गंभीर आहे. **भविष्यात चुकीच्या नोंदींचे प्रस्ताव सादर केल्यावर सादर करणाऱ्या विभागाने व अधिदान व लेखाकार्यालयाने योग्य तो समन्वय साधुन विहीत मुदतीत प्रकरणाचा निपटारा होईल याची दक्षता घेण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

बचत प्रामुख्याने सामग्री व पुरवठा या उद्दिष्टाखालील अपेक्षित देयके विहित वेळेत प्राप्त न झाल्याने झाली आहे. १९८२ नंतर कामकाजामध्ये बराच बदल झालेला आहे. उद्योग विभागाच्या कामकाजामध्ये देखील बराच बदल झालेला आहे त्यामुळे १९८२ च्या पुस्तिकेमध्ये दुरुस्ती केली पाहिजे असे शासनाने संचालक, शासकीय मुद्रणालय यांना कळविले आहे. विभागाकडून जी मागणी येते आणि तेथून पुढे जी कार्यवाही सुरु होते त्याबाबत फेरविचार करणे आवश्यक आहे यासाठी संचालक शासकीय मुद्रणालय यांनी समिती नियुक्त केलेली आहे. त्यानुसार समितीने आवश्यक ते बदल करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. यामध्ये सिक्युरिटी पेपरचा मुद्दा आहे. **सिक्युरिटी पेपर ठराविक प्रकारचा असतो. सिक्युरिटी पेपरच्या पुरवठादारांची संख्या कमी असते. निविदा काढत असताना इतर पेपरच्या संदर्भात अडचण येत नाही. परंतु सिक्युरिटी पेपर कमी मिळाले किंवा निविदांना पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही तर निविदांना पुन्हा मुदतवाढ देण्याशिवाय पर्याय नसतो उद्योग संचालनालयाचा सन १९८२ च्या नियम पुस्तिकेमध्ये बदल करताना सिक्युरिटी पेपरच्या निविदा प्रक्रियेमध्ये स्वतंत्रपणे सुधारणा प्रस्तावित करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

मुंबई शहरातील युनिट बांधा, वापरा व हस्तांतर तत्वावर देण्याचा विचार सुरु असून याबाबत विभागीय सचिवांनी समितीस असे विहीत केले की, विकास आयुक्त उद्योग विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती त्या समितीमध्ये संचालक आणि तज्ञ लोकांचा समावेश होता. त्यांनी व्यापक आधुनिक कार्यक्रमाचा आराखडा तयार केला होता. उद्योग विभागाची एकदंरीत वार्षिक योजना बघितली तर दरवर्षी राज्य व जिल्हास्तरीय योजनाबाबत ४० ते ५० कोटी रुपये इतकीच रक्कम मिळते. ही रक्कम फक्त प्रिंटींगसाठी नाही तर संपूर्ण उद्योग विभागासाठी मिळते. याबाबत वित्त विभागाचे असे म्हणणे होते की, खाजगीकरण करावे, वित्त विभागाच्या मताशी उद्योग विभाग सहमत नसून त्यांच्या म्हण्यानुसार आधुनिकीकरण केल्यानंतर त्यांच्याकडे जो मनुष्यबळ उपलब्ध आहे त्याचा योग्य वापर करता येईल. अंधेरी, चुनाभट्टी येथे संचालक, शासकीय मुद्रणालय, तसेच उद्योग संचालनालयाची जागा आहे. मंत्रिमंडळाची

मान्यता घेऊन ती जागा बांधा, वापरा व हस्तांतर तत्वावर द्यावी. आधुनिकीकरणाच्या कार्यक्रमासाठी ३५ कोटी रुपये अपेक्षित आहेत मुंबई आणि नागपूर येथे मोठी शासकीय मुद्रणालय असून तेथे आधुनिक यंत्रसामग्री खरेदी करावयाची आहे. सन २००९-२०१० यावर्षी पहिल्यांदा अधुनिकीकरणाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून यंत्रसामग्रीसाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. एकूण योजना लक्षात घेता दरवर्षी ३ ते ५ कोटी रुपये निधी प्राप्त करुन घेता येईल. सन २००९-२०१० यावर्षी अंदाजपत्रकामधून ३ ते ३.५ कोटी रुपये मिळालेले आहेत आणि त्याची पुर्तता झालेली आहे. सन २०१०-२०११ या वर्षी सुध्दा तेवढीच तरतुद करण्यात आलेली आहे.

बांधा, वापरा व हस्तांतर यासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनीवर उद्योग विभागाचे जुने बांधकाम असून तेथे संचालक, शासकीय मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांच्या सदनिका आहेत. त्या सदनिकांची त्यांनी पुनर्बांधणी करावी तसेच उद्योग संचालनालयासाठी उद्योग भवन बांधावे त्यामध्ये वेगवेगळया प्रकारच्या सोई असतील आणि उर्वरित भागाचा उपयोग या प्रकल्पाकरीता निधी उभारण्यासाठी विकासकाने करावा अशी विभागाची योजना असून बांधकाम करुन सुध्दा रुपये ३५ कोटी अतिरिक्त रक्कम रहाणार आहे असे समितीस दिलेल्या माहितीवरुन दिसून आले. उद्योग विभागाने बांधा, वापरा व हस्तांतरण या योजनेची माहिती समितीस एक महिन्यात सादर करावी.

मुंबई व नागपूर येथे मोठी शासकीय मुद्रणालये आहेत. या मुद्रणालयाकडून शासकीय प्रकाशनाचे काम बहुतांशी प्रमाणात हाताळण्यात येते. परंतु सद्य: शासकीय मुद्रणाचे काम खाजगी मुद्रणालयाकडून करण्यात येत असून त्यावर शासनाचा निधी मोठया प्रमाणावर खर्च होत आहे. मुंबई व नागपूर येथील मुद्रणालयाचे अत्याधुनिकीकरण झाल्यास शासकीय प्रकाशनाच्या मुद्रणाची कामे या मुद्रणालयामार्फत करण्यात येतील व त्यामुळे निधीची बचत होईल याकरीता शासकीय मुद्रणालयांच्या आधुनिकीकरणासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा व त्यासाठी उद्योग विभागाने आपल्या अंदाजपत्रकात भरीव रकमेची तरतूद करावी अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट-१

मंगळवार, दिनांक ४ मे, २०१०

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार,दिनांक ४ मे, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी वाजता सुरु होऊन दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.५५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट , वि.स.स.

<u>सदस्य</u>

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर , वि.स.स.

३) डॉ.नामदेव उसेंडी , वि.स.स.

४) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर , वि.स.स.

५) श्रीमती मिनाक्षी पाटील , वि.स.स

६) श्री.नवाब मलिक , वि.स.स.

७) श्री.विलास लांडे , वि.स.स.

८) श्री.संजय सावकारे , वि.स.स.

९) श्री.गिरीष महाजन , वि.स.स.

१०) श्री.नानाभाऊ पटोले , वि.स.स.

११) श्री.आर.एम.वाणी , वि.स.स.

१२) श्री.एकनाथ शिंदे , वि.स.स.

१३) श्री. सुरेशदादा देशमुख , वि.प.स.

१४) श्री. विनोद तावडे , वि.प.स.

१५) डॉ. दिपक सावंत , वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री भा. ना. कांबळे, सह सचिव

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

१) श्री. कुरुविला- उप महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :

डॉ. प्रदीप व्यास, सचिव

साक्षीदार :

महसुल व वन विभाग

१) श्री.एम.रमेश कुमार, अप्पर मुख्य सचिव (महसूल)

२) श्री.बी.पी.पांडे, प्रधान सचिव (वने)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालसंदर्भात प्रधान सचिव, महसुल व वन (वने) विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक ५ मे, २०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार,दिनांक५ मे, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.३५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट , वि.स.स.

<u>सदस्य</u>

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.

३) डॉ.नामदेव उसेंडी , वि.स.स.

४) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स

५) श्री.ए.टी.पवार , वि.स.स.

६) श्री.नवाब मलिक, वि.स.स.

७) श्री.संजय सावकारे , वि.स.स.

८) श्री.गिरीष महाजन , वि.स.स.

९) श्री.सुर्यकांत दळवी , वि.स.स.

१०) श्री.आर.एम.वाणी ,वि.स.स.

११) श्री.भाई जगताप ,वि.प.स.

१२) श्री. विनोद तावडे , वि.प.स.

१३) डॉ. दिपक सावंत , वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री भा. ना. कांबळे, सह सचिव

२) श्रीमती मेघना तळेकर, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

२) श्री. कुरुविला- उप महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :

डॉ. प्रदीप व्यास, सचिव

साक्षीदार :

नियोजन विभाग

१) श्री.सुनिल पोरवाल, प्रधान सचिव, (अ.का.)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालसंदर्भात प्रधान सचिव, नियोजन विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक १२ मे, २०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १२ मे, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.४० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट , वि.स.स.

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.

३) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.

४) श्री.विलास लांडे ,वि.स.स.

५) श्री.संजय सावकारे , वि.स.स.

६) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

७) श्री.आर.एम.वाणी , वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्रीमती मेघना तळेकर, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

३) श्री. कुरुविला- उप महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :

डॉ. प्रदीप व्यास, सचिव

साक्षीदार :

सार्वजनिक आरोग्य विभाग

१) श्रीमती शर्वरी गोखले, अप्पर मुख्य सचिव

२) श्री. जयंत कुमार बाँटिया, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालसंदर्भात अप्पर मुख्य सचिव व प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक २६ मे, २०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार,दिनांक २६ मे, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट , वि.स.स.

सदस्य

२) डॉ.नामदेव उसेंडी , वि.स.स.

३) श्री.नवाब मलिक , वि.स.स.

४) श्री.विलास लांडे , वि.स.स.

५) श्री.संजय सावकारे , वि.स.स.

६) श्री.सुर्यकांत दळवी , वि.स.स.

७) श्री.आर.एम.वाणी ,वि.स.स.

८) श्री. विनोद तावडे , वि.प.स.

९) डॉ. दिपक सावंत , वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री अ.मा.शिंदेकर, सचिव

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

१) श्री. कुरुविला- उप महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :

डॉ. प्रदीप व्यास, सचिव

साक्षीदार :

शालेय शिक्षण विभाग

श्री.संजय कुमार, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालसंदर्भात प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक ९ जून , २०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार,दिनांक ९ जून, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.४० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट , वि.स.स.

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.

३) डॉ.नामदेव उसेंडी , वि.स.स.

४) श्री.अमित देशमुख , वि.स.स.

५) श्रीमती मिनाक्षी पाटील , वि.स.स

६) श्री.ए.टी.पवार , वि.स.स.

७) श्री.संजय सावकारे , वि.स.स.

८) श्री.नानाभाऊ पटोले , वि.स.स.

९) श्री.बाळा नांदगावकर , वि.स.स.

१०) श्री. विनोद तावडे , वि.प.स.

११) डॉ. दिपक सावंत , वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री भा. ना. कांबळे, सह सचिव

२) श्रीमती मेघना तळेकर, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

१) श्री. कुरुविला- उप महालेखाकार, मुंबई
२) श्री.पी.ए. निर्मलकुमार, उप महालेखाकार,नागपूर
३) श्री.एम.डी.पारखी, अे.अे.ओ

वित्त विभाग :

डॉ. प्रदीप व्यास, सचिव

साक्षीदार :

उद्योग विभाग

१) श्री.ए.एम.खान, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालसंदर्भात प्रधान सचिव, उद्योग विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

<u>सिंधुदुर्ग दौरा</u>
मंगळवार, दिनांक २९ जून ,२०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २९ जून, २०१० रोजी आंबोली (जिल्हा सिंधुदुर्ग) येथे दुपारी १.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री.गिरीश बापट , वि.स.स.

२) **<u>सदस्य</u>**

३) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.

४) श्री.नवाब मलिक - वि.स.स.

५) श्री.विलास लांडे - वि.स.स.

६) श्री.संजय सावकारे - वि.स.स.

७) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.

८) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.

९) श्री.भाई जगताप - वि.प.स.

१०) श्री. विनोद तावडे - वि.प.स.

११) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री.एस.एन.सानप, कक्ष अधिकारी

निमंत्रित :

साक्षीदार :

महसूल व वन (वने) विभाग

१) श्री.विक्रम कुमार, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग
२) श्री.रा.का.पोले, वन संरक्षक, कोल्हापूर
३) श्री.नरेश झुरमुरे, उप वनसंरक्षक, सावंतवाडी
४) श्री.जी.टी.चव्हाण, उप वनसंरक्षक, कोल्हापूर

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालसंदर्भात जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग व वन संरक्षक व उप वन संरक्षण, कोल्हापूर व उप वनसंरक्षक, सावंतवाडी महसुल व वन (वने) विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

सोमवार, दिनांक १३ डिसेंबर , २०१०

लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार,दिनांक १३ डिसेंबर,२०१० रोजी विधान भवन, नागपूर येथे दुपारी ४.०० वाजता सुरु होऊन सायं. ५.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट , वि.स.स.

<u>सदस्य</u>

२) श्रीमती मिनाक्षी पाटील , वि.स.स

३) श्री.संजय सावकारे , वि.स.स.

४) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

५) श्री.गिरीष महाजन , वि.स.स.

६) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

७) श्री.एकनाथ शिंदे , वि.स.स.

८) श्री.बाळा नांदगावकर , वि.स.स.

९) श्री.भाई जगताप , वि.प.स.

१०) श्री. विनोद तावडे , वि.प.स.

११) डॉ. दिपक सावंत , वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री भा. ना. कांबळे, सह सचिव

२) श्री. ऋतूराज ज. कुडतरकर, अवर सचिव

३) श्री.एस.एन. सानप, कक्ष अधिकारी

समितीने दुसरा प्रारूप अहवाल विचारात घेतला व काही फेरफारांसह संमत केला.